ह. भ. प दासगणु महाराजांचे शिष्य रा. दामोदर वामन आठवले उर्फ दामुअण्णा याना पंढरपूर मुक्कामीं कफक्षयाच्या विकाराने पौष शुद्ध १० च्या दिवशीं सकाळीं देवाज्ञा झाली, हे कळविण्यास आम्हास अत्यंत खेद वाटत आहे. बहुतेक सर्व महाराष्ट्रात व विशेष करून श्री साई महाराजाचे भक्तमंडळात दासगणुमहाराज व त्यांचे शिष्य दामुअण्णा या दोन व्यक्तींना न ओळखणारा क्वचितच कोणी असूं शकेल व दामुअण्णाच्या अकालीं मृत्यूमुळे प्रत्येकाला हळहळ वाटेल. गेल्या रामनवमीच्या उत्सवात शिरडीस दासगणुमहाराजांचे जे कीर्तन झाले ते दामुअण्णांचे साथीने झालेलें दासगणु महाराजाचे शेवटचे कीर्तन. त्यावेळेपासूनच दामुअण्णाची प्रकृति खालावत चालली होती, व शेवटी दुखणें क्षयावर जाऊन त्यात त्याचा अंत झाला.

दामु अण्णा हे मुळचे कोंकणचे राहणारे. घरची स्थिति गरीबीची म्हणून लहानपणींच विद्याभ्यास करण्याकरितां हे देशावर आले. वार लावून किंवा कोणाचे घरीं पूजा वगैरे करण्यास राहून विद्यार्जन करावे हा मनांतला हेतु. त्याप्रमाणे त्यांनीं मराठी शिकण्यास सुरवात केली. कल्याणचे कै. नानासाहेब चांदोरकर यांनीं दामुअण्णानां आश्रय दिला. दामु अण्णा हे साधारण देखणे असून त्यांचा आवाजही चागला होता. यावेळीं दासगणू-महाराज हे एकटेच कीर्तन करित असत. त्याना दामुअण्णाची जोड दिल्यास फार बहारीचे कीर्तन होईल असे नानासाहेबास वाटून, त्यानीं दामुअण्णाना दासगणु महाराजांचे स्वाधीन केले. ही नानासाहेबांची योजना किती फलद्रूप झाली हें सर्वांनां माहीत आहेच. वास्तविक ही योजना श्री सद्गुरु साईमहाराजाचीच.नानासाहेब निमित्तमात्र झाले. सुंदर गोड आवाज, देखणेपणा या दोन गुणांमुळे दामुअण्णा लहानपणींच एखाद्या नाटक कंपनींत ओढले जावयाचे. नानासाहेबांकडे येण्यापूर्वी दामु अण्णा काहीं दिवस पुण्यास एका प्रसिद्ध नाटक कंपनीशीं दृढ संबंध असलेल्या गृहस्थाकडे त्यांचे घरीं पूजा

करून त्याचे आश्रयाला होतेही. परंतु योगायोग दुसरा असल्यामुळे वर लिहिल्याप्रमाणे दासगणूमहाराजांचा व त्यांचा संबंध जडला

दामुअण्णाचे मराठी शिक्षण चांगले झाले होते त्यांची बालबोध व मोडी अशीं दोन्हीं हस्ताक्षरे फार सुदर होतीं. त्यांनी थोडा सस्कृत भाषेचाही अभ्यास केला होता. त्याची धारणाशक्ति फार विलक्षण होती. दासगणु महाराजाची सर्व आख्याने व त्याची १०० किंवा २०० हून अधिक श्लोक असलेलीं इतर काव्ये दामुअण्णाला मुखोद्गत होतीं दामुअण्णा कविता करीत असत. त्याची श्री समर्थ साईमहाराजावरील पद्ये प्रसिद्धच आहेत. दामु अण्णा स्वत: कीर्तन फार चांगले करीत असत. दासगणु महाराजांची कीर्तनपरंपरा त्यांनीं फार चागली चालविली असती, परतु त्याच्या अकाली मृत्युमुळे एक चागला होतकरू कीर्तनकार नाहीसा झाला.

दामुअण्णा दासगणु महाराजाना आपले गुरू मानीत असत गुरू शिष्याचे एकमेकावर फार प्रेम असे. त्यामुळे त्याचा विरह दासगणु महाराजाना फार शोकास्पद वाटेल यांत शंका नाहीं. पण त्यांना व दामुअण्णाना ओळखणारा प्रत्येकजण त्याच्या दु:खाचे वाटेकरी आहे, हे लक्षांत घेऊन त्यांनीं समाधान मानून घेतलें पाहिजे.

# अध्याय २६ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरु साईनाथायनमः

भूतभौतिक विषय जात । हें अखिल विश्वनिजांतर्गत ॥
दर्पणीं नगरीसें प्रतिबिंबित । मायाविजृंभित मायिक ॥ १ ॥
वस्तुगत्या अनुद्भूत । आत्मस्वरूपीं अनुस्यूत ॥
तें हें विश्वस्वरूपीं स्थित । दिसे उद्भूत चराचर ॥ २ ॥
जें जें कांहीं आरिसां दिसे । तें तें वास्तव तेथें नसे ॥
जैसें वासनामय निद्रेंत आभासे । परी तें नासे प्रबोधीं ॥ ३ ॥
जाग्रदावस्था प्राप्तकाळें । स्वप्नोपलब्ध प्रपंच वितळे ॥
अद्वयानंदप्रकाश विवळे । महावाक्य मेळें सद्गुरूच्या ॥ ४ ॥
विश्वाचें जें सत्ता स्फुरण । तयांचें अन्यनिरपेक्ष अधिष्ठान ॥
तो गुर्वात्मा ईश्वर जैं प्रसन्न । तयींच साक्षात्करण हें ॥ ५ ॥
स्वप्रकाश सदात्मक । तें हें आत्मस्वरूप देख ॥
तेथें हें विश्व भूतभौतिक । माया कौतुक हा खेळ ॥ ६ ॥

---

१ आरशांत. २ शहरासारखें. ३ मायेचा देखावा. ४ खरोखर पाहतां. ५ प्रकट झालेलें नाहीं. ६ ओंविलेलें. ७ आरशांत. ८ वस्तुत. ९ जागृती आल्यावर. १० प्रकट होतो.

आब्रह्मस्तंबपर्यंत । भूतभौतिक हें सर्व कल्पित ॥
ऐसें हें विस्तारलें जगत । मायाविजृंभित केवळ ॥ ७ ॥

सर्प माला दंड धारा । स्वरूपाज्ञानें मानिती दोरा ॥
तैसाचि हा सकळ जगत्पसारा । स्वरूपीं थारा नाहीं या ॥ ८ ॥

हें दृश्य जात मायामय । तत्वज्ञानें यासीं लय ॥
गुरुवाक्य प्रबोधसमय । प्राप्त होय त्याकाळीं ॥ ९ ॥

त्रितीय पुरुष एकवचनी । ' गृणाति ' रूपार्थ धरितां मनीं ॥
शिष्यास तत्त्वोपदेशदानीं । गुरु एक जनीं समर्थ ॥ १० ॥

म्हणवूनि प्रार्थूकीं बाबांप्रत । करवी बुद्धि अंतरासक्त ॥
नित्यानित्य विवेक युक्त । वैराग्यरत मज करी ॥ ११ ॥

मी तों सदा अविवेकी मूढ । आहे अविद्याव्यवधाननिगूढ ॥
बुद्धी सर्वदा कुतर्कारूढ । तेणेंचि हें गूढ पडलें मज ॥ १२ ॥

गुरुवेदांत वचनीं भरंवसा । ठेवीन मी अढळ ऐसा ॥
करी मन जैसा आरसा । निज बोध ठसा प्रकटेसा ॥ १३ ॥

वरी सद्गुरो साई समर्था । करवी या ज्ञानाची अन्वर्थता ॥
विना अनुभव वाचा विग्लापनता । काय परमार्था साधील ॥ १४ ॥

म्हणोन बाबा अपुल्या प्रभावें । हें ज्ञान अंगें अनुभवावें ॥
सहज सायुज्य पद पावावें । दान हें द्यावें कृपेनें ॥ १५ ॥

तदर्थ देवा सद्गुरुसाई । देहाहंता वाहतों पायीं ॥
आतां येथून तुझें तूं पाहीं । मीपण नाहींच मजमाजी ॥ १६ ॥

घेई माझा देहाभिमान । नलगे सुखदुःखाची जाण ॥
इच्छेनुसार निजसूत्रा चालन । देऊनि मन्मन आवरी ॥ १७ ॥

---

१ स्वस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाचे अभावीं, २ तोंडाची बडबड.

अथवा माझें जें मीपण । तेंचि स्वयें तूं होऊनि आपण ॥
घेई सुखदुःखाचें भोक्तेपण । नको विवंचन मज त्याचें ॥ १८ ॥
जयजयाजी पूर्णकामा । जडो तुझियाठायीं प्रेमा ॥
मन हें चंचल मंगलधामा । पावो उपरमा तव पायीं ॥ १९ ॥
तुज वांचूनि दुजा कोण । सांगेल आम्हास हितवचन ॥
करील अमुचें दुःखनिरसन । समाधान मनाचें ॥ २० ॥
दैव शिरडीचें म्हणून झालें । बाबा तेथें आगमन आपुलें ॥
पुढें तेथेंच वास्तव्य केलें । क्षेत्रत्व आणिलें त्या स्थाना ॥ २१ ॥
धन्य शिरडीचें सुकृत । कीं हा साई कृपावंत ॥
करी या स्थळा भाग्यवंत । अलंकृत निजवास्तव्यें ॥ २२ ॥
तूंचि माझा चेतविता । तूंचि माझी वाचा चाळिता ॥
तैं मी कोण तव गुण गाता । कर्ताकरविता तूं एक ॥ २३ ॥
तुझा नित्य समागम । हाचि आम्हा आगमनिगम ॥
तुझें नित्य चरित्रश्रवण । हेंच पारायण आमुतें ॥ २४ ॥
अनिमेष[१] तुझें नामावर्तन । हेंच आम्हा कथा कीर्तन ॥
हेंचि आमुचें नित्यानुसंधान । हेचि समाधान आम्हांतें ॥ २५ ॥
नलगे आम्हां ऐसें सुख । जेणें होऊं भजन विन्मुख ॥
याहून अधःपतन तें अधिक । परमार्थ बाधक काय असे ॥ २६ ॥
आनंदाश्रू उष्ण जीवन । करूं तेणें चरणक्षालण ॥
शुद्ध प्रेम चंदन चर्चन । करवूं परिधान सत्श्रद्धा ॥ २७ ॥
हे अंतरंग पूजा विधान । बाह्योपचार पूजेहून ॥
एणें तुज सुप्रसन्न । सुखसंपन्न करूं कीं ॥ २८ ॥
सात्वीक अष्टभाव कमल । अष्टदल अतीव निर्मल ॥
मन करून एकाग्र अविकल । वाहूं निजफल संपादूं ॥ २९ ॥

---

१ एक निमिष व्यर्थ न जातां.

लावूं भावार्थ बुका भाळा । बांधूं दृढ भक्तीची मेखळा ॥
बाहूं पदांगुष्टींगळा । भोगूं सोहळा अलोलिक ॥ ३० ॥

प्रीति रत्नालंकारमंडण । करूं सर्वस्व निंबलोण ॥
करूं भक्तिचामरांदोलन । तापनिवारण तन्मय छत्रें ॥ ३१ ॥

समर्पूं ऐसी स्वानंदपूजा । अष्टभाव गंध अर्गजा ॥
ऐसे आम्ही आमुच्या काजा । साईराजा पूजूं तुज ॥ ३२ ॥

अभीप्सितार्थ सिद्ध्यर्थ । स्मरूं नित्य " साईसमर्थ " ॥
याच मंत्रें साधूं परमार्थ । होऊं कृतार्थ निजनिष्ठा ॥ ३३ ॥

पूर्वील अध्यायीं कथन । साई समर्थ दयाघन ॥
साधावयास निज भक्त कल्याण । कैसें शिक्षण ते देत ॥ ३४ ॥

आतां ये अध्यायीं निरूपण । भक्तां स्वगुरुपदीं स्थापन ॥
कवणें परी करीत जाण । कथाविंदान तें परिसा ॥ ३५ ॥

गताध्यायांतीं निदर्शित । भक्तपंतकथामृत ॥
श्रोतां परिसिजे दत्तचित्त । तत्व निश्चित व्हावया ॥ ३६ ॥

कैसे कैसे अनुभव दाविले । कैसे नेत्रीं निष्टांजन सूदिलें ॥
कैसें स्वगुरुपदीं अढळ केलें । मन निवालें कैसेंनीं ॥ ३७ ॥

एकदां एक बहुत श्रमें । भक्त एक पंत नामें ॥
गेले शिरडीस मित्र समागमें । दर्शनकामें साईच्या ॥ ३८ ॥

ते पूर्वील अनुगृहीत । होते निज गुरुपदीं स्थित ॥
शिरडीस जावें किंनिमित्त । झाले शंकित मानसीं ॥ ३९ ॥

तथापी जयाचा जैसा योग । तैसा अकल्पित घडतो भोग ॥
आला साईदर्शनाचा ओघ । जाहला अमोघ सुखदायी ॥ ४० ॥

आपण कल्पावी एक योजना । ईश्वराच्या आणीकचि मना ॥
अदृष्टापुढें कांहीं चालेना । तें स्वस्थ मना परिसिजे ॥ ४१ ॥

ठेवूनिया शिरडीचें प्रस्थान । कित्येक जन निज स्थानाहून ॥
निघाले अग्निरथीं बैसून । सकळ मिळून आनंदें ॥ ४२ ॥

गाडींत जें हे चढले अवचित । तेथेंच होते स्थित हे पंत ॥
शिरडीस जाण्याचा तयांचा बेत । झाला अवगत पंतांस ॥ ४३ ॥

मंडळींत कांहीं पंताचे स्नेही । त्यांतची कांहीं विहिणी व्याही ॥
पंतांचे मनांत जाणें नसतांही । बळेंच आग्रहीं सांपडले ॥ ४४ ॥

आरंभी पंतांचा विचार । जाणें होतें जेथवर
तिकीटही तयांचें तेथवर । पुढें तो विचार बदलला ॥ ४५ ॥

स्नेही व्याही म्हणती चला । जाऊं समवेत कीं शिरडीला ॥
मनीं नसतांही आग्रहाला । होकार दिधला पंतांनीं ॥ ४६ ॥

पंत उतरले विरारास । मंडळी गेली मुंबईस ॥
उसनें घेऊनि खर्चावयास । पंतही मुंबईस मग गेले ॥ ४७ ॥

मोडवेना मित्रांचें मन । मिळविलें निज गुर्वनुमोदन ॥
आले मग ते शिरडीलागून । सकळ मिळूनि आनंदें ॥ ४८ ॥

गेले सर्व मशीदीस । सकाळीं अकराचे समयास ॥
दाटी भक्तांची पूजनास । पाहूनि उल्हास वाटला ॥ ४९ ॥

पाहूनि बाबांचें ध्यान । जाहले सकळ आनंदसंपन्न ॥
इतक्यांत पंतास झीट येऊन । बेशुद्ध होऊन ते पडले ॥ ५० ॥

पातली जीवास विकलता । पावले सबल निचेष्टता ॥
सांगातियां उद्भवली चिंता । अति व्यग्रता मानसीं ॥ ५१ ॥

मंडळीची मदत मोठी । साई बाबांची कृपादृष्टी ॥
करितां मस्तकीं उदक वृष्टी । गेली निचेष्टितता समूळ ॥ ५२ ॥

होऊनियां सावधान । उठूनि बैसले खडबडोन ॥
वाटले जणू झोपेंतून । आतांच उठून बैसले ॥ ५३ ॥
बाबा पूर्ण अंतर्ज्ञानी । तयाची गुरुपुत्रता जाणूनी ॥
तयास अभयता आश्वासूनि । निज गुरुभजनीं स्थापिती ॥ ५४ ॥
येवो म्हणती प्रसंग कांहीं । " आपना तकिया छोडना नहीं " ॥
सदासर्वदा निश्चळ राही । अनन्य पाहीं एकत्वीं ॥ ५५ ॥
पंताला ती पटली खूण । निज गुरूचें जाहलें स्मरण ॥
साईबाबांचें कनवाळूपण । राहिलें स्मरण जन्माचें ॥ ५६ ॥
तैसेच एक मुंबापुरस्थ । हरिश्चंद्र नामें गृहस्थ ॥
पुत्र अपस्मार व्यथाग्रस्त । तेणें अति त्रस्त जाहले ॥ ५७ ॥
देशी विदेशी वैद्य झाले । कांहीं एक उपाय न चले ॥
पाहून सर्वांचे प्रयत्न हरले । राहतां राहिले साधुसंत ॥ ५८ ॥
सन एकोणीससें दहा सालीं । दास गणूंचीं कीर्तनें झालीं ॥
श्री साईनाथांची कीर्ति पसरली । यात्रा वाढली शिरडीची ॥५९ ॥
कुग्राम परी भाग्यें थोर । शिरडी झाली पंढरपूर ॥
महिमा वाढला अपरंपार । यात्रा अपार लोटली ॥ ६० ॥
रोग घालविती केवळ दर्शनें । अथवा केवळ हस्तस्पर्शनें ॥
अथवा शुद्ध कृपावलोकनें । आले अनेकां अनुभव ॥ ६१ ॥
होतां अनन्य शरणागत । कृत कल्याण पावत भक्त ॥
जाणूनि सकळांचें मनोगत । पुरवीत मनोरथ सर्वांचें ॥ ६२ ॥
उदी धारणें पिशाचें पळतीं । आशिर्वचनें पीडा टळती ॥
कृपा निरीक्षणें बाधा चुकती । लोक येती धांवोनी ॥ ६३ ॥
ऐसें महात्म्य कथाकीर्तनीं । दास गणूंच्या ग्रंथांतूनीं ॥
ऐकोनी या कर्णोपकर्णीं । उत्कंठा दर्शनीं उदेली ॥ ६४ ॥

सर्वें घेऊनि मुलेंबाळें । नानाविध उपायनें फळें ॥
आले शिरडी ग्रामास पितळे । पूर्वार्जितबळें दर्शना ॥ ६५ ॥

मुलास पायांवरी घातलें । स्वयें बाबांस लोटांगणीं आले ॥
तों तेथ एक विपरीत वर्तलें । पितळे गडबडले अत्यंत ॥ ६६ ॥

दृष्टादृष्ट साईची होतां । मुलगा पावला बेशुद्धावस्था ॥
डोळे फिरविले पडला अवचिता । मातापिता गडबडले ॥ ६७ ॥

पडिला विसंज्ञ भूमीसी । तोंडासि आली उदंड खरसी ॥
चिंता ओढवली मातापित्यासीं । काय दैवासीं करावें ॥ ६८ ॥

निघूनि गेला वाटे श्वास । तोंडावाटे चालला फेंस ॥
फुटला घाम सर्वांगास । सरली आस जीविताची ॥ ६९ ॥

ऐसे झटके अनेक वेळां । पूर्वी येऊनि गेले मुलाला ॥
परी न इतुका विलंब झाला । प्रसंगाला एकाही ॥ ७० ॥

हा न भूतो न भविष्यति । त्यानें आणिली प्राणांतिक गति ॥
मातेच्या डोळां अश्रू न खळती । पाहूनि स्थिति बाळाची ॥ ७१ ॥

आलों किमर्थ झालें काय । उपाय तो झाला अपाय ॥
ऐसे घातुक व्हावे हे पाय । व्यर्थ व्यवसाय झाला कीं ॥ ७२ ॥

घरांत रिघावें चोरा भेणें । तों घरचि अंगावरी कोसळणें ॥
तैसेंच कीं हें अमुचें येणें । झालें म्हणे ती बाई ॥ ७३ ॥

व्याघ्र भक्षील म्हणूनि गाई । जीवा भेणें पळूनि जाई ॥
तिजला मार्गांत भेटे कसाई । तैसेंच पाही जाहलें ॥ ७४ ॥

उन्हांत तापला पांथस्थ । वृक्षच्छायेस जों विसावत ॥
तों वृक्षचि उन्मळूनि पडत । झाली ते गत तयांसीं ॥ ७५ ॥

---

१ शेट हरिश्चंद्र पितळे. २ फेंस. ३ श्री साईबाबांचे पाय.

भाव ठेऊनि देवावरी । पूजेस जातां देऊळाभीतरीं ॥
देऊळचि कोसळे अंगावरीं । तैसीच परी हे झाली ॥ ७६ ॥
बाबा मग तयां आश्वासिती । धीर धरावा थोडा चित्तीं ॥
मुलास उचलूनि न्या निगुती । निजावगती तो लाधेल ॥ ७७ ॥
मुलास घेऊनि जा बिऱ्हाडीं । आणीक एक भरतां घडी ॥
सजीव होईल तयाची कुडी । उगीच तांतडी करूं नका ॥ ७८ ॥
असो पुढें तैसें केलें । बोल बाबांचे खरे झाले ॥
पितळे सहकुटुंब आनंदले । कुतर्क गेले विरोन ॥ ७९ ॥
वाडियांत नेतां तो कुमर । तात्काळ आला शुद्धीवर[1] ॥
मातापितयांचा फिटला घोर । आनंद थोर जाहला ॥ ८० ॥
मग पितळे स्त्रियेसहित । बाबांचिया दर्शना येत ॥
करीत साष्टांग प्रणिपात । अति विनीत होऊनी ॥ ८१ ॥
उठला पाहूनि आपुला सुत । साभार मानसीं आनंदित ॥
बसले बाबांचे चरण चूरित । बाबा सस्मित पूसती ॥ ८२ ॥
कां त्या संकल्प विकल्प लहरी । शांत झाल्या का आतां तरी ॥
ठेवील निष्ठा धरील सबूरी[2] । तयासी श्रीहरी रक्षील ॥ ८३ ॥
पितळे मूळचेच श्रीमंत । घरंदाज लौकीकवंत ॥
मेवा मिठाई लुटवीत । बाबांस अर्पित फळ पान ॥ ८४ ॥
कुटुंब तयांचें फार सात्विक । प्रेमळ श्रद्धाळू भाविक ॥
बाबांकडेस लावूनि टक । खांबानिकट बैसतसे ॥ ८५ ॥
पहातां पहातां डोळे भरावे । ऐसें तिनें नित्य करावें ॥
पाहूनि तत्प्रेमाचे नवलावे । अत्यंत भुलावें बाबांनीं ॥ ८६ ॥
जैसे देव तैसेच संत । भक्त पराधीन ते अत्यंत ॥
अनन्यत्वें तयां जे भजत । कृपावंत तयांवरी ॥ ८७ ॥

---

१ त्याची शुद्धी. २ धैर्य.

असो ही मंडळी जावया निघाली । मशीदीस दर्शनार्थ आली ॥
बाबांची अनुज्ञा उदी घेतली । तयारी केली निघावया ॥ ८८ ॥

इतुक्यांत बाबा काढिती तीन । रुपये आपुले खिशांतून ॥
पितळ्यांस निकट बोलावून । बोलती वचन तें परिसा ॥ ८९ ॥

बापू[1] तुजला पूर्वी दोन । दिधलेनी[2] म्यां त्यांत हे तीन ॥
ठेवूनि यांचे करी पूजन । कृतकल्याण होसील ॥ ९० ॥

पितळे रुपये घेती करीं । प्रसाद जाणोनि आनंदें स्वीकारी ॥
लोटांगणीं येत पायांवरी । म्हणती कृपा करी महाराजा ॥ ९१ ॥

मनीं उदेली विचार लहरी । माझी तों ही प्रथम फेरी ॥
बाबा हें वदती काय तरीं । हें मज निर्धारीं कळेना ॥ ९२ ॥

बाबांस पूर्वी नाहीं देखिलें । पूर्वी दोन कैसे दिधले ॥
अर्थावबोध कांहींच न कळे । विस्मित पितळे मनिं झाले ॥९३ ॥

कैसी व्हावी परिस्फुटना । वाढली मनाची जिज्ञासुता ॥
बाबा न लागूं देत पत्ता । राहिली मुग्धता तैसीच ॥ ९४ ॥

संत सहज उद्गारले जरी । तरी ते वाणी होणार खरी ॥
जाणीव ही पितळ्यांचे अंतरीं । म्हणून विचारीं ते पडले ॥ ९५ ॥

परी पुढें हे मुंबापुरीं । गेले जेव्हां आपुले घरीं ॥
होती घरांत एक म्हातारी । जिज्ञासा पुरी ती करी ॥९६ ॥

म्हातारी पितळ्यांची माता । सहज शिरडीचा वृत्तांत पुसतां ॥
निघाली तीन रुपयांची वार्ता । संबंध-कथा जुळेना ॥ ९७ ॥

विचार करितां स्मरण झालें । मग म्हातारी पितळ्यांस बोले ॥
आतां मज यथार्थ आठवलें । बाबा बोलले सत्य तें ॥ ९८ ॥

---

१ या नांवानें श्री साईबाबा 'कोणाला' मोठ्या प्रेमानें संबोधित.
२ दिले होते.

आतां त्यां तुझ्या मुलास नेलें । शिरडीस साईचें दर्शन करविलें ॥
तैसेंच पूर्वी तुज पित्यानें वहिले । होतें नेलें अक्कलकोटीं[1] ॥ ९९ ॥
तेथील महाराजही सिद्ध । परोपकारी महा प्रसिद्ध ॥
अंतर्ज्ञानी योगी प्रबुद्ध । पिताही शुद्ध आचरणीं ॥ १०० ॥
घेवोनि तव पित्याची पूजा । प्रसन्न झाला योगीराजा ॥
दोन रुपये प्रसादकाजा । दिधले पूजा कराया ॥ १०१ ॥
हे ही पूर्वील रुपये दोन । स्वामींनीं बाळा तुज लागोन ॥
दिधले होते प्रसाद म्हणून । पूजनार्चन करावया ॥ १०२
तुमचें देव देवतार्चन । त्यांत हे होते रुपये दोन ॥
करीत असत नेमें पूजन । अति निष्ठेनें वडिल तुझे ॥ १०३ ॥
तयांची निष्ठा मी एक जाणें । वागत गेले निष्ठेप्रमाणें ॥
तयांच्या पश्चात पूजा उपकरणे । जाहलीं खेळणी मुलांची ॥१०४ ॥
निष्ठा उडाली देवावरची । लाज वाटूं लागली पूजेची ॥
पूजेसिं योजना झाली मुलांची । दाद रुपयांची कोण घेई ॥ १०५
ऐसीं कित्येक वर्षें लोटली । रुपायांची त्या वेदाद झाली ॥
आठवणही साफ बजाली । जोडी हरवली रूपयांची ॥ १०६ ॥
असो तुमचें भाग्य मोठें । साईमिषें महाराजचि भेटे ॥
पुसावया विस्मरणांची पुटें । तैसींच संकटें निरसाया ॥ १०७ ॥
तरी आतां येथूनि पुढें । सोडूनि द्यावे तर्क कुडे ॥
पहा आपल्या पूर्वजांकडे । नको वांकडे व्यवहार ॥ १०८ ॥
करीत जा रुपयांचें पूजन । संतप्रसाद माना भूषण ॥
समर्थ साईनीं ही पटविली खूण । पुनरुज्जीवन भक्तीचें ॥ १०९ ॥
ऐकतां ही मातेची कथा । परमानंद पितळ्यांचे चित्ता ॥
ठसली साईची व्यापकता । आणि सार्थकता दर्शनाची ॥ ११० ॥

१ अक्कलकोटचे स्वामी.

मातेचें तें शब्दामृत । नष्ट भावना करी जागृत ॥
देई पश्चात्ताप प्रायश्चित्त । भावी हित ठरवी ॥ १११ ॥
असो होणार होऊनि गेलें । पुढील कार्यी संतीं जागविलें ॥
मानूनि तयांचे उपकार भले । सावध राहिले निजकार्या ॥ ११२ ॥
ऐसीच एक आणीक प्रचीती । कथितों परियेसा स्वस्थ चित्तीं ॥
भक्तांच्या उच्छृंखल मनोवृत्ती । बाबा आवरिती कैशा तें ॥ ११३ ॥
गोपाळ नारायण आंबडेकर । नामें एक भक्त प्रवर ॥
आहे बाबांचा पुणेकर । परिसा सादर तत्कथा ॥ ११४ ॥
आंग्लभौम सरकार पदरीं । अबकारी खात्यांत होती नोकरी ॥
दहा वर्षें भरतां पुरीं । बैसले घरीं सोडूनी ॥ ११५ ॥
दैव फिरलें झालें पारखें । सर्व दिवस नाहींत सारखे ॥
आले ग्रहदशेचे गरके । कोण फरके न भोगितां ॥ ११६ ॥
आरंभीं ठाणें जिल्ह्यांत नोकर । पुढें नव्रींवीं आलें जव्हार ॥
होते जेथें अम्मलदार । तेथेंच बेकार जाहले ॥ ११७ ॥
नोकरी आळवावरचें पाणी । पुनश्च पडावें कैसें ठिकाणीं ॥
प्रयत्नाची शिकस्त त्यांनीं । पाहिली करूनी त्यावेळीं ॥ ११८ ॥
परी न आलें तयासीं यश । निश्चय ठरला रहावें स्ववश ॥
आपत्तींचा झाला कळस । जाहले हताश सर्वांपरी ॥ ११९ ॥
वर्षोनवर्ष खालीं खालीं । सांपत्तिक स्थिति खालावली ॥
आपत्तीवर आपत्ती आली । दुःसह झाली गृहस्थिती ॥ १२० ॥
ऐसीं गेलीं वर्षें सात । सालोसाल शिरडीस जात ॥
बाबांपुढें गाऱ्हाणें गात । लोटांगणी येत दिनरात्र ॥ १२१ ॥
एकोणीससें सोळा सालांत । वैतागून गेले अत्यंत ॥
वाटलें करावा प्राणघात । शिरडी क्षेत्रांत जाऊनी ॥ १२२ ॥

कुटुंब समवेत या समयास । राहिले शिरडीस दोन मास ॥
काय वर्तलें एके निशीस । तया वार्तेस परियेसा ॥ १२३ ॥
दीक्षितांचे वाड्यासमोर । एका बैलाचे गाडीवर ॥
बसले असता आंबडेकर । चालले विचार तरंग ॥ १२४ ॥
कंटाळले ते जीवितास । वृत्ती झाली अत्यंत उदास ॥
पुरे आतां हा नको त्रास । सोडिली आस जीविताची ॥ १२५ ॥
करूनिया ऐसा विचार । होऊनिया जीवावरी उदार ॥
विहिरींत उडी घालावया तत्पर । आंबडेकर जाहले ॥ १२६ ॥
दुसरें कोणी नाहीं जवळा । साधूनि ऐसी निवांत वेळा ॥
पुरवीन आपुले मनाचा सोहळा । दुःखा वेगळा होईन ॥ १२७ ॥
आत्महत्येचे पाप दुर्धर । तरी हा दृढ केला विचार ॥
परी बाबा साई सूत्रधार । तेणें हा अविचार टाळिला ॥ १२८ ॥
तेथेंच चार पावलांवर । एका खाणावळवाल्याचें घर ॥
तयांसही बाबांचा आधार । तोही परिचारक बाबांचा ॥ १२९ ॥
सगुण येऊनि उंबऱ्यावरती । पुसे आंबडेकरांस ते वक्ती ॥
ही अक्कलकोट महाराजांची पोथी । वाचिली होती का कधीं ॥१३०॥
पाहूं पाहूं काय ती पोथी । म्हणून आंबडेकर हातीं घेती ॥
सहज पानें चाळूनि पाहती । वाचूं लागती मध्येंच ॥ १३१ ॥
कर्मधर्मसंयोग कैसा । विषयही वाचावया आला तैसा ॥
अंतर्वृत्तींत वाचण्यासरिसा । उमटला ठसा तात्काळ ॥ १३२॥
सहजासहजीं आली जी कथा । निवेदितों मी श्रोतियां समस्तां ॥
तात्पर्यार्थें अति संक्षेपता । ग्रंथ विस्तारताभयार्थ ॥ १३३ ॥
अक्कलकोटीं संत वरिष्ठ । असतां महाराज अंतर्निष्ठ ॥
भक्त एक बहु व्याधिष्ठ । दुःसह कष्ट पावला ॥ १३४ ॥

---

१ सेवेकरी.

सेवा केली बहुत दिन । व्याधीविहीन होईन म्हणून ॥
होईनात ते कष्ट सहन । अति उद्विग्न जाहला ॥ १३५ ॥
करूनि आत्महत्येचा निर्धार । पाहूनिया रात्रीचा प्रहर ॥
जाऊनि एका विहिरीवर । केला शरीरपात तेणें ॥ १३६ ॥
इतुक्यांत महाराज तेथे आले । स्वहस्तें तयास बाहेर काढिले ॥
भोक्तृत्व सारें पाहिजे भोगिलें । उपदेशिलें तयास ॥ १३७ ॥
अपुल्या पूर्वकर्मा जोग । व्याधी कुष्ट क्लेश वा रोग ॥
जाहल्यावीण पूर्ण भोग । हत्यायोग काय करी ॥ १३८ ॥
हा भोग राहतां अपुरा । जन्म घ्यावा लागे दुसरा ॥
म्हणूनि तसेच साहें कष्ट जरा । आत्महत्यारा होऊं नका ॥ १३९ ॥
वाचूनि ही समयोचित कथा । थक्क जाहले आंबडेकर चित्ता ॥
जागींच वरमले अवचिता । बाबांची व्यापकता पाहूनी ॥ १४० ॥
आंबडेकर मनीं तरकले । पूर्व अदृष्ट पाहिजे भोगिलें ॥
हेंच योग्य प्रसगीं सुचविलें । साहस योजिलें न भलें तें ॥ १४१ ॥
जैशी वाचा अशरीरिणी । तैसीच या दृष्टांताची करणी ॥
हेत जडला साईचे चरणीं । अघटित घटणी साईची ॥ १४२ ॥
सगुणमुखे साईचा इषारा । हा अकल्पित पुस्तकद्वारा ॥
यावया विलंब लागता जरा । होता मातेरा जन्माचा ॥ १४३ ॥
मुकलों असतों निज जीविता । करितों दुर्धर कुटुंब घाता ॥
स्त्रियेवरी ओढवितों अनर्था । स्वार्था परमार्था नागवितों ॥ १४४ ॥
पोथीचे करूनिया निमित्त । बाबांनी केलें सगुणास प्रवृत्त ॥
आत्मघातापासाव चित्त । परावृत्त केलें कीं ॥ १४५ ॥
प्रकार ऐसा जरी न घडता । बिचारा व्यर्थ जिवास मुकता ॥
परी जेथें साईसम तारिता । काय तो मारीता मारील ॥ १४६ ॥
अक्कलकोट स्वामीची भक्ती । या भक्ताचे वडिलास होती ॥
तीच पुढें चालवा ही प्रचीती । आणूनि देती त्या बाबा ॥ १४७ ॥

---

१ आत्महत्या करून घेण्याचा प्रसंग. २ आकाशवाणी.

असो पुढें वरवें झालें । हेही दिवस निघून गेले ॥
ज्योतिर्विद्येंत परिश्रम केले । फळही आलें उदयाला ॥ १४८ ॥
साईकृपा प्रसाद पावले । पुढें आले दिवस चांगले ॥
ज्योतिर्विद्येत प्राविण्य संपादिलें । दैन्य निरसलें पूर्वील ॥ १४९ ॥
वाढले गुरुपदीं प्रेम । जाहले सुख कुशल क्षेम ॥
लाधले गृहसौख्य आराम । आनंद परम पावले ॥ १५० ॥
ऐसे अगणित चमत्कार । एकाहूनि एक थोर ॥
कथितां होईल ग्रंथ विस्तार । तदर्थ सार कथियेले ॥ १५१ ॥
हेमाड साईपदीं शरण । पुढील अध्यायीं गोड कथन ॥
विष्णुसहस्रनाम दान । शामया लागूनि दीधलें ॥ १५२ ॥
नको नको म्हणतां शामा । बाबांस अनिवार तयाचा प्रेमा ॥
बळेंच देतील सहस्रनामा । सुंदर महात्म्य वर्णून ॥ १५३ ॥
आतां सादर परिसा ती कथा । अनुग्रहाचा समय येतां ॥
शिष्याची इच्छा मुळींही नसतां । बाबा तो देतां दिसतील ॥ १५४ ॥
अनुग्रहाची अलौकिक परी । कैसी असते सद्गुरु घरीं ॥
दिसूनि येईल अध्यायांतरीं । श्रोतां आदरें परिसिजे ॥ १५५ ॥
कल्याणाचें जें कल्याण । तो हा साई गुण निधान ॥
सभाग्य पुण्यश्रवण कीर्तन । चरित्र पावन जयाचें ॥ १५६ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरिचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । अपस्मारात्महत्या निवारणं
तथा निज गुरुपद स्थिरीकरणं नाम । षड्विंशतितमोऽध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

---

१ माधवराव देशपांडे.

या मासिकात आरंभापासून प्रसिद्ध होत असलेल्या श्री साईसच्च- रितावर रावबहादूर श्री. चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए. एल्‌एल्. बी. कल्याण. यांचा **अभिप्राय.**

साईलीला मासिकात येणारे रा. दाभोळकर गोविंद रघुनाथ हे लिहीत असलेले श्रीसाईसच्चरित मी मोठ्या प्रेमाने वाचतो. या चरित्रात भक्ति व ज्ञान या दोहोचे उत्तम आविष्करण होत आहे व ते अनुभवाच्या मार्गाने होत असल्याने ग्रंथाची भाषा गोड व गंभीर अशीच येत आहे. ओव्यांतील चारी यमके सहज प्रयत्नाविना साधलेलीं असतात, व विषयही मनोवेधक रीतीने मांडलेला असतो. श्री–साईचरित्राला मला वाटतें, हेमाडपंत हे महित- तीच लाधले आहेत. संतचरित्र गाण्यास काव्य व भक्तिरसाची जोड नेहमींच लागते व या दोहोंचाही मिलाफ या चरित्रात चांगला व्यक्त होतो. ”

---

# आख्यान–रत्न–माला, नांदेड.

या मालेत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिली जातील ह. भ. प. संतकवी **दासगणू**महाराजांचीही प्रेमळ व प्रासा- दिक आख्यानें येतील


वर्षांतून सहा पुस्तकें निघतील पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ स. ४८ प्र. पु. किं ८-आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतीत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु


**— ग. अ. सराफ, नांदेड.**



कोपरगांवच्या गंगेचा देखावा.



ज्यांत रामचंद्र पाटील उभे आहेत
त्या साठ्यांचे ( हल्लीं नवलकरांचे )
वाड्याचे मुख्य दरवाज्याचा देखावा.



शिर्डी येथील दिव्याचे घरासहीत
लेंडीवरील देखावा



श्री. अमीदास मेथा यांच्या समाधीवर
त्याच्या पादुकांच्या स्थापनाविधीचा
देखावा

21-2-12.

I got up as usual but my prayer was disturbed by the noise which Devaji whom we call Sakshatkaribwa made. I managed to control my mind and finished my prayers. Later we saw Sayin Maharaj go out and held our Panchadashi class. After it I went to the Musjid and saw Sayin Baba being served by Baroda ladies of the Shirke family. A dancing woman of Bombay arrived today and sang in few songs in the Musjid. She says she is a pupil of Balkrishnabwa. Sayin Baba heard her songs. Then the midday Arti passed off as usual. Sayin Baba was in a very good mood. After midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class with our usual members. About sunset I went to see Sayin Baba at his evening stroll and again after Wada Arti for the the Shej Arti. The processions and other arrangements were very grand today. The Bhajan was with cymbals and all. The Bombay dancing girl gave a few songs in the Musjid also after the Shej Arti. At night Bhishma read Bhagwat and Das-Bodh.

22-2-12.

This morning there was Kakad Arti and we all attended it. The ladies of the Shirke family went away soon after the Arti with their attendants. The Bombay dancing girl also went away with her men. She said she wished to go to Amraoti. We held our Panchadashi class. After it I learnt that my wife had a dream this morning that Sayin Baba sent her a message by Bandu to go atway today before 9 a m. Sayin Baba also asked Dada Kelkar and Bala Simpi whether I was talking of going away. There is note from Natekar (Hansa) that I would be permitted to return to Amraoti about the end of this month. All this raised the hopes of my wife, but at the midday Arti time there was no mention of the [illegible] made by Sayin Baba. Madhaorao Deshpande returned i[illegible] y Arti from Harda. His wife and children also came from Ahmednagar. After the midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class till nearly nightfall when I hastened to the Musjid, saw Sayin Saheb and took Udi. At night Bhishma read Dasbodh and Bhagwat and had Bhajan Mr Bhate, Mr. Bapusaheb Abkari Inspector and some children of the latter

came to see me at night and we sat talking for some time on the usual subjects of the wonders daily worked by Sayin Baba. Madhaorao Deshpande was also present then

23-2-12.

I got up as usual, prayed and in the morning held the Panchdashi class. Besides our usual members a lady from Nasik by name Mrs Sundarabai was present. We saw Sayin Baba go out and again at the Musjid after he returned to the Musjid He told me a story, how, when he was young, he went out one morning and suddenly became a girl and continued to be so for some time He did not give many details The midday Arti passed off as usual Many people came to worship today After the midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class Madhaorao asked Sayin Baba today about my return and got a reply to the effect that times being very unfavourable to me I would have to remain here a few months more In the evening we went to see Sayin Baba. at the evening stroll and then after the Wada Arti. Here was Shej Arti and later on Bhishma read Bhagwat and Dasa Bodha

24-2-12.

I attended the Kakad Arti and then held our Panchdashi class. We saw Sayin Maharaj go out and later on attended the Musjid for the midday Arti. Everything went off very much as usual and after the midday meal I lay down for a while. Mr. Sane Mamledar of Kopargaon and Mr. Nanasaheb Behere Revenue Inspector came with Balasaheb Bhate and sat talking for some time. After they went away we continued our Panchadashi class but the progress was very slow. We saw Sayin Baba at his evening stroll and in the evening the Nasik ladies assisted in the Bhajan after the Wada Arti. They have good voices but they appear to be very weak and can make no sustained effort.

ति० रा. रा. काकासाहेब यास कृ. सा. न. वि. वि.

आपल्या खुशालीसंबंधानें काहींच न समजल्यामुळे काळजी वाटत आहे. तरी पत्रदर्शनीं खुशाली कळवावी. रा रा. आत्माराम बाळाजी स्टॉपऱ्हेडर कैलासवासी झाल्याचें दुःखद वर्तमान आपणांस समजलेच असेल. बाबाचा मोठा भक्त होता.

आपण आपल्या मासिक पुस्तकात "श्री बाबाच्या" ह्यातीतल्या गोष्टी प्रसिद्ध करीत असता; पण आपण त्याच्या निर्गत होण्यानंतरच्या ( चर्मचक्षूला ते दिसत नाहीं पण ते अजूनही तेथें आहेत ) लोकांच्या अनुभवाच्या गोष्टी प्रसिद्ध करण्याचा विचार जाहिरातरूपानें प्रकट केल्यास पुष्कळ भक्तांकडून आपले अनुभव प्रसिद्ध होण्यासाठीं आपणाकडेस येतील. योग्य वाटल्यास उपयोग करावा.

मला सुमारे पाचसहा महिन्यापासून मलेरिया तापानें गांठले होतें. औषध चालू होते, पण पाळ्या चुकत. शेवटीं शेवटीं त्या तापानें आपले खरे स्वरूप प्रकट केलें. विषम होऊन एकवीस दिवस बिछान्यांत बेशुद्ध स्थितींत पडलो. दिवसेंदिवस ताप वाढतच जात होता. डॉक्टर, वैद्य व इतर आप्त, स्नेही वगैरे यांनीं अशा सोडली.

ज्या दिवशीं तापाची मुदत ( २१ दिवस संपली ) संपत आली त्या दिवशीं तर सर्वांच्या आशेचा भंग झाला. संध्याकाळीं मुलगा चि. गणपत रामचंद्र नाईक हा एल्. एल्. बी. झाल्यामुळे घरांतील श्री अक्कलकोट स्वामी महाराज, श्री साईनाथ महाराज व श्री. दत्तोपंत बाळेकुंद्री महाराज, व माणिक प्रभु याच्यासाठीं नेहमीपेक्षा मोठे कमालखानी हारतुरे व पेढे घेऊन घरीं आला. त्याला हा प्रकार पहातांच जगरीतीप्रमाणें वाईट वाटलें; पण त्याची भावना श्री. सद्गुरु बाबा साईनाथ यांच्यावर इतकी दृढ होती व आहे कीं, त्यांनीं सर्व चेहेऱ्यांस हार घालून व नैवेद्य दाखवून श्री समर्थांच्यावर आपला भार घालून स्वस्थ बसला. रात्रीं सुमारें १ वाजतां अंगांतून

घाम येऊ लागला. मला हळू हळू शुद्धी येऊं लागली होती माझ्या नाकावर सूत ठेऊन डॉक्टराला बोलावणं पाठविले होते

इतक्यात माझा बिछाना " श्री साईनाथ महाराज " यांच्या मोठ्या फोटोखाली होता, तेथून त्यास घातलेला फुलांचा हार न तुटता माझे गळ्यात पडला (हे तेथे जमलेल्या सर्व मंडळीने पाहून मला नंतर सांगितले) श्री समर्थांनी त्याच वेळीं माझ्या हाताला धरून उठविले व सांगितले कीं, "निजतोस काय, शिर्डीला केव्हा येणार ? मी तुझी वाट पहात आहे. शिर्डीला येशील तेव्हा नेहमींप्रमाणे काहीं दिवसासाठीं रहावयास न येता लवकरच सर्व संसाराचा भार मुलावर टाकून पेनशन घेऊन माझी सेवा करण्यासाठीं तेथें येऊन रहा. मी तुझा व तुझ्या कुटुंबाचा परामर्श घेईन. आता तरी मीच आलो किंवा नाहीं ?"

याच रात्रीं डॉक्टर आले व मला बिछान्यावर बसलेला पाहून आनंदानें म्हणाले " आता हरकत नाहीं वेळ निभावली. असो शक्ती येईल." मी उदी घेऊन व प्रसाद तोंडास थोडासा लावून पुन्हा झोपी गेलों सकाळीं कितीतरी थोडासा हुशारी वाटली. मी चार महिन्याचे रजेवर आहे. अझून शक्ती आलेली नाहीं. हवेसाठीं जाणार आहे पण बाहेर गावीं थंडीत एकटे जाणे हे ठीक दिसत नाहीं सबब येथेंच राहिलो आहे. पुढच्या महिन्यात बहुधा बाहेरगांवीं जाईन म्हणतो.

आपला नम्र सेवक
**रामचंद्र केशव नाईक.**

## ॥ श्री सांईमाउली प्रसन्न ॥

वांद्रे ता. १५-१-२५

मित्रवर्य श्री. रा. सा. **गोविंदराव रघुनाथ दाभोळकर** यास
**श्री सांईलीला कचेरी**
५ टर्नररोड वांद्रे

वि. वि. ह्यासोबत माझ्या एका परमप्रिय मित्राची हकीकत मी पाठवित आहे. तरी त्यातल्या आपणांस योग्य त्या गोष्टी प्रसिद्ध करण्यासारख्या वाटल्यास त्याप्रमाणे श्रीसांईलीलेत प्रसिद्ध व्हाव्या.

आम्ही सर्व मंडळी सुमारे २५।३० स्त्रिया व पुरुष. ता. ६ सप्टेंबर १९१० रोजीं दादरहून निघून दुसऱ्या दिवशीं सुमारे ९।१० वाजता सद्गुरू माउलीच्या चरणापाशीं सादर झालो. माझ्या मित्राच्या मनात दर्शन घ्यावयाचे विशेष कारण हे होते कीं, आम्ही सर्वांनीं त्या पूर्वी दोन तीन महिने ह. भ. प. श्री दासगणु ह्यांचीं प्रेमळ कीर्तने ऐकलीं होतीं. व जरी माझा मित्र एक अस्सल प्रार्थनासमाजिष्ट व मूर्तिपूजेविरुद्ध होता तरी त्याच्या मनात त्या कीर्तनामुळे साकाराची, सगुण उपासनेची गोडी उत्पन्न झाली व त्यामुळें श्री सांई बाबांच्या दर्शनाची उत्कंठा झाली आम्ही दर्शन घेतल्याबरोबर श्री साईबाबाच्या शांत व प्रेमळ चर्येवरून माझ्या मित्राच्या मनावर गोड परिणाम झाला. पण त्याला आतून एकसारखा निदिध्यास लागला होता कीं आपण सत्पुरुष आहात हे जाणण्याची मला मुळींच अक्कल नाहीं, तर इतराप्रमाणें मी आपणापुढे कापूर उदबत्ती जाळून व नारळ ठेऊन आपली व माझी निष्कळ फसवणूक तर करीत नाहीना? असा एक सारखा विचार चालला होता. एव्हढयात श्रीनीं विचारलें, "हा कोणाचा नारळ?" कोणी म्हणाले. 'ह्यांचा" (माझ्या मित्राचा). बाबा म्हणाले, "घे" आणि माझा मित्र उठून प्रसाद घेतो एव्हढयांत बाबा मोठ्यानें बोलले, "ह्या गडयाला उठाली बनाव रूप मखत लागतो." सर्व मंडळी खदखदा हासली. पण माझ्या मित्राला

तो योग्य तो खुलासा झटला ( निश्चय दृढ करण्याचा ) व प्रसाद घेताना तात्काळ मनात दृढ निश्चय केला " बाबा मला कांही कळत नाही, या उपरात मी सर्व भार आपणावर टाकतो" हे त्यानीं मनात म्हटले व बाबा मोठ्याने 'बरे' म्हणाले. त्याचा विस्मय वाटून व पुन्हा थोडा विकल्प उत्पन्न होऊन व इतर सर्व जाडे जाडे विद्वान् शास्त्रे पुराणे वाचलेले, व आपण त्या बाबतीत निव्वळ अज्ञान असे वाटून मित्र मोठ्याने व कळवळ्याने बोलला " बाबा, आपणाला प्रश्न विचारू का ?" बाबा बोलले 'विचार'. मित्र म्हणाला, ' बाबा, आपली कृपा सर्वांवर सारखी आहे का ?' बाबा मोठ्याने गर्जून म्हणाले, " प्रश्न विचारायला अक्कल लागते. हे काय काय भलतेच विचारतोस ? माझी नजर सगळ्यावर सारखी आहे." हा बाबाचा जबाब ऐकण्याबरोबर पुन्हा सर्व मंडळी मोठ्याने खो खो करून हासली. परंतु त्या हासण्याचा मित्रावर मुळींच अनिष्ट परिणाम न होता, त्याला अत्यंत हुषारी व उमेद वाटली, व मनाला फार धीर आला, कीं आपल्याला पाठीराखा आहे. आता कसलीच फिकीर नाहीं. तो त्याचा अनुभव अद्याप पावेतो उत्कट रीतीने जागृत आहे.

त्या नंतर मित्राला वाटले, कीं आपणाला इतराप्रमाणें कांहींतरी इष्ट दैवत असावे, कीं ज्याचे ध्यान व चिंतन करण्यास ठीक पडेल. असा विचार करीत व इकडे आरती चालली आहे अशा वेळीं जी समोर जुन्या शाळेची बारी आहे व जेथे रोज संध्याकाळीं राधाकृष्णाबाई बत्त्या लावीत असे, तिकडे नजर गेली; तर त्या बारींतून एक अत्यंत लावण्यवती व तेजस्वी स्त्री अमोलिक दागिने घातलेली, उत्तम वस्त्र परिधान केलेली मित्राकडे एक सारखी पाहत असलेली त्याने पाहिली. अशी स्वरूपसंपन्न स्त्री त्यानें जन्मांत पाहिली नव्हती व त्या नंतरही पाहिली नाहीं. जरी श्रीमंत गायकवाड सरकारच्या तोषाखान्यांतील सर्व अमूल्य दागिने त्याला पूर्णपणें माहीत होते, तरी त्या स्त्रीने परिधान केलेलें वस्त्र व दागिने कितीतरी पटींनीं श्रेष्ठ व अप्रतीम होते ! माझा मित्र क्षणभर आनंदांत व आश्चर्यांत

गर्क झाला. तरी पण आपण कुणाच्यातरी बायकोकडे पाहत आहोत व हे गैर करीत आहो असा विचार येतांच तिकडून नजर फिरवून व श्रीकडे पाहताच श्रीची नजर एका विशिष्ट प्रकाराने व प्रीतियुक्त अशी आपणाकडे लागली आहे हे पाहतांच मनात अत्यंत खजिल झाला व पुन्हा त्या बाजूकडे पाहवयाचे नाहीं असा निश्चय केला. आरती चालली होतीच. मित्रानें मागील प्रकार मनातून साफ काढून टाकला व साहजिकपणे इकडे तिकडे पाहता त्या बारीकडे नजर जाता, पुन्हा त्या स्त्रीचे दर्शन झाले. व त्यामुळे आश्चर्य वाटले ! पण ह्यावेळीं झट्कन मन दाबून श्रीच्या मुखाकडे पाहिले, व त्याचे ते प्रेमपूर्वक आपणाकडे अवलोकन पाहून, त्या बारीकडे पुन्हा पाहण्याचे सोडून दिले. तरी मनांत हेच आश्चर्य वाटले कीं इतकी सुस्वरूप स्त्री इतक्या मूल्यवान अलंकारानीं भरलेली अशा एका खेडेगांवात बिनधास्त रहावी हे कसें ?

त्या नंतर ते आणखी दोन वेळां शिर्डीस गेले तेव्हां पुन्हा त्याच बारींत त्याच स्त्रीचे दर्शन झाले. तिसऱ्या खेपेनंतर स्नेही बाळकराम याजपाशीं मुबईत गोष्ट चालली असता बाळकराम म्हणाले कीं ती साक्षात् अन्नपूर्णा माता होती व त्यानाही तिचे दर्शन घडले होतें. बाळकराम नंतर थोडयाच दिवसानीं चाकरी, मुलेबाळे सोडून श्रीसाईबाबांच्यापाशीं कायम सेवा करण्यास गेले.

असो. मध्यतरीं श्री बाबाचे ध्यान हळू हळू माझ्या मित्राच्या हृदयात बसले व त्याला श्री अन्नपूर्णेची उपासना करण्याचे कारण राहिले नाहीं. तथापि मित्र असें म्हणतात कीं, ते ल्हानपणापासून स्त्रीद्वेष्टे होते. परतु श्री अन्नपूर्णेचे दर्शन घडल्यादिवसापासून स्त्री जातीविषयीं आदर उत्पन्न होऊन तिरस्कार नाहींसा झाला.

मित्राचें दुसऱ्या खेपेचे जाणें ६ डिसेंबर १९१० मध्यें झाले. त्या वेळीं मुख्य कारण हे होते कीं, श्रींच्या पायांजवळ बसल्याने मनाला संतोष, सुख होतें आणि संसाराच्या दगदगींचा विसर पडतो ह्या भावनेने

मित्र गेला असता त्याला तिकडे अगदींच विपरीत प्रकार दिसून आला रा. साठ्यांच्या वाड्यात पाऊल टाकता क्षणींच, एक्या जाड्या विद्वानाने 'शिर्डीस येण्याचे प्रयोजन काय ?' वगैरे सवालानीं त्याला भडावून टाकले व दुसऱ्या एकाने स्थितप्रज्ञ म्हणजे काय ह्याचा खुलासा व्हावा म्हणून सारखी टकळी माडली. परिणाम असा झाला कीं, दोन तासाच्या अवधींत त्याचे मस्तक भणभणले व त्याने मनाने बाबाचा धावा केला कीं, 'हे काय ? मी आपल्या पायापाशीं शातीची याचना करण्यासाठीं आलो असतां हे माझ्या पाठीमागे काय नसते लचाड लागले आहे ? मी तेथे (मुबईत) बरा होतो.' असे मनात म्हणत म्हणत श्रींच्या दर्शनास गेले. पायावर मस्तक ठेवतांच बाबा माधवरावजीस म्हणाले, "शामा, ह्याला काहीं साग" माधवराव-जींनीं मला हकीकत विचारली व मी सकाळीं घडलेला प्रकार त्याना सागितला ते म्हणाले, "हीच तर देवाची (साईबाबाची) लीला देवाने ह्या प्रकाराने असे सुचविले कीं संसारात असेच प्रसग यावयाचे, तर तेथें मुळींच लक्ष न देता सर्व प्रकार पाहून व मन त्यात न घालून ते देवाच्या पायाशीं निश्चळ ठेवावे, म्हणजे त्यात खरे समाधान आहे" असे बोलून ते दोघे पुन्हा बाबाच्या दर्शनास गेले. जाताक्षणींच बाबा सुप्रसन्न मुद्रेने आशीर्वाद देऊन म्हणाले, "शामाने सागितले तसे वागत जा." त्यानंतर संसारात अनेक संकटे व वादावादीचे वगैरे प्रकार आले व येत आहेत. त्या सर्वांतून श्रींच्या पूर्ण कृपेमुळे माझा मित्र अद्यापपर्यंत पार पडला आहे.

ह्यानंतर श्री सांईबाबांच्या सहज लीलेचे अनेक अनुभव माझ्या मित्राला व त्याच्या कुटुंबांतील लहान थोर सर्व माणसाना दिसून आले व अद्यापि श्रींच्या देहपातानंतरही येत आहेत व आमचा पाठीराखा अद्यापि सतत उभा आहे असे त्या सर्वांस खात्रीपूर्वक वाटून त्याचे समाधान होत आहे. ज्या स्थितींत बाबा ठेवतील ती स्थिती त्याना सदैव सर्वस्वीं प्रमाण.

तिसऱ्या खेपेला माझ्या मित्राची बायको त्याच्या बरोबर शिर्डीला पहिल्याने गेली. मित्रानें आपल्याबरोबर नेलेली ( संकल्प केलेली ) सर्व दक्षिणा श्रींच्या स्वाधीन केली. त्यानंतर बाबांनीं मित्राच्या कुटुंबाजवळ सहा रुपये दक्षिणा मागितली. बाईला वाटलें कीं ते निव्वळ रूपये. परंतु मित्राला तसे वाटेना. त्या दिवशीं दोन प्रहरीं व दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाबांनीं सहा रुपयांची कळवळीने मागणी केली. बाई वाड्यांत आल्यावर रडूं लागली. मित्राने तिची समजूत घातली कीं, ते चांदीचे रूपये नव्हत. परंतु षड्रिपूंची मागणी आहे, व तुझा बाबांवर सत्पुरूष ह्या नात्यानें पूर्ण विश्वास असेल व बाबांवर भार ठेवल्याने तुझें जर कल्याण होईल असें खात्री पूर्वक वाटेत असेल तर येथे ( वाड्यांत ) बसून मनोभावानें सहा रुपये म्हणजे "षड्रिपू तुम्हाला मी अर्पण केले आहेत" असें बोल, म्हणजे पहा कशी गम्मत होते ती. तिनें त्याप्रमाणे केलें, व तीं उभयतां दोनप्रहरीं श्रींच्या चरणापाशीं गेलीं. जातांच बाबा म्हणाले, "आई, माझे रुपये आणलेस?" बाई म्हणाली, "बाबा, मी ते तुम्हाले दिले." बाबा म्हणाले, "खचित दिले?" बाई म्हणाली, "होय खचित दिले." तेव्हां बाबा म्हणाले, "पहा हो फिरशील!" आतां जर चांदीच्या रुपयांचीच मागणी होती तर फिरशील ह्याचा अर्थ काय?

असो. ह्या प्रमाणें श्रद्धापूर्वक वर्तन ठेवले असतां ईश्वर क्षणभर तरी उधारी ठेवतो काय? बाई बाबांची सेवा करीत बसली होती. तिच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवून व आस्ते फिरवून बाबा म्हणाले, "आई, आपलं डोकं लयी दुखतं. नाहीं?" ( त्या बाईचें डोकें सतत सहा सात वर्षें एकसारखें दुखत होते, व यामुळे तिला फार त्रास झाला होता, परंतु डोके बरें व्हावें या हेतूने ती शिर्डीस गेली नव्हती. ) बाबांनीं ह्याप्रमाणें प्रश्न विचारतांच बाई म्हणाली, "बाबा, या घडीपर्यंत डोकें दुखत होतं. आतां मुळींच दुखत नाहीं." बाबा म्हणाले, "आई, आतां आपलं डोकं नाहीं दुखायचं बरं."

आणि त्याप्रमाणे ह्या गोष्टीला आज सुमारे १४ वर्षे झालीं बाईचें डोकें दुखलें नाहीं.

बाबा नंतर म्हणाले, " आई, तूं मला चांगलं चांगलं खाऊं घालीत होतीस, पण आतां मला विसरलीस. " बाईला आश्चर्य वाटून ती म्हणाली, " बाबा, मी तर तुम्हांला आतांच पाहते." बाबा म्हणाले, " अग, मी तर तुला लहान होतीस तेव्हांपासून पाहतों." ह्या गोष्टीचा तिला स्वाभाविक-रीतीने उलगडा होईना. तेव्हां बाबा म्हणाले, "आई तुझ्या घरीं कोण दैवत आहे ? " ती म्हणाली, "गणपती" ( ह्या गणपती विषयीं पुढे सुरेख संवाद येईल ). बाबा पुन्हा म्हणाले, "तुझ्या आईच्या घरीं कोण दैवत होतं ?" ती म्हणाली, " गणपती" व स्वाभाविकरीतिने लहानपणाची आठवण होऊन म्हणाली, " बाबा, मी लहानपणीं घरांत आलेल्या जिन्सापैकीं उत्तम फळें फुले, खारका, बदाम, नारळ वगैरे गणपतीपुढे ठेवीत असे." बाबा म्हणाले, "ते सर्व मला मिळत असत आणि तेव्हापासून तुला पाहतो." त्या नंतर म्हणाले, " तुझा गणपती सुरेख मुरत आहे." तेव्हां तिला आठवण होऊन ती म्हणाली, "बाबा, तो उजव्या सोंडेचा आहे आणि त्याचा एक हात मोडलेला आहे लोक सांगतात अशी मूर्ति घरात ठेवूं नये, पाण्यांत शेळवावी." तेव्हां बाबा म्हणाले "आपल्या मुला लेकराचा हातपाय उटला तर आपण त्याला बुडविता का ? तो गणपति लई लकी आहे. त्याची पूजा अर्चा रोज करीत जावी" त्यानंतर म्हणाले "आई, मला तुझ्या घरीं रोज तीनदा यावें लागतें." असें म्हणून घराच्या खाणाखुणा सर्व इतक्या स्पष्ट रीतीने सांगितल्या कीं ती आश्चर्यचकित झाली मित्र कोठें निजतो, बाई कोठे निजते, मुलगा कोठे निजतो देवाचा देव्हारा मागला पुढला व्हेरांडा वगैरेची इतकी बारीक माहिती सांगितली, कीं बाईला हेच साक्षात् परमेश्वर आहेत अशी तिची पूर्ण खात्री झाली व तिचा त्या प्रकारचा बाबावर जो दृढ-विश्वास बसला, तसा विश्वास बसण्यास माझ्या मित्राला त्याच्या चिकित्सक बुद्धीमुळे त्याला अनेक वर्षें लागलीं. सारांश, षड्रिपु अर्पण

केल्याची उधारी देवानें तात्काळ फेडून टाकली. खऱ्या श्रद्धेची फेड अशीच होत असते.

ह्याच वेळेला माझ्या मित्राला एक विलक्षण आशीर्वाद दिला. त्यावेळीं त्याचे अंग प्रेमाने थरारून आले, व त्याला अत्यंत संतोष वाटला. आश्चर्याची गोष्ट ही कीं बाबांनीं ते शब्द एवढ्या मोठ्या आवाजानें उच्चारले होते तरी पण एका क्षणापूर्वीं दीक्षित यानीं बाबांच्या पाया-वर मस्तक नम्र केलें, नंतर मित्राने, व नंतर काका महाजनींनीं, असे असता मित्राला पाया पडतांना जो आशीर्वाद दिला तो दीक्षतांना व काका महाजनी यांना ऐकूं आला नाहीं. बाबांच्या लीला अगाध आहेत

मित्राच्या मनांत श्री राम नामाचा त्रयोदश अक्षरी तारक मंत्राचा जप सारखा चाललेला असे. त्याची खूण देण्यासाठीं, बाबा एके दिवशीं दोन हात जोडून नमस्कार करून म्हणाले, “ याव र मचंद्र महाराज.” मित्र ह्या सत्काराने बराच गोंधळून गेला, पण जेव्हां त्याला समजलें, कीं नमस्कार श्रीराम नामाला आहे, तेव्हा त्याला आनंद वाटला.

एके वेळीं मित्राच्या बायकोने मुंबईस त्यांच्या राहत्या घरीं एक रुपया मागितला. तिला रुपयाची गरज होती, व मित्राला स्टेशनावर जाव-याचे होते. त्यानें आपली पिशवी उघडून पाहिली, तिच्यामध्ये एक दहा रुपयांची नोट होती सुटे रुपये नव्हते, तेव्हां तो म्हणाला कीं नोट मोडून तुला संध्याकाळीं रुपया देईन. घराचा दादर उतरतांना व साहजिक रुमा-लाचा खिसा चांचपतांना त्यांत एक रुपया सुटा असलेला त्याला आढळला. त्या वेळीं त्याचें कर्तव्य होतें कीं तो रुपया तात्काळ बायकोला द्यावा. तसेच गाडी पकडावयाला अवकाश पण होता. तरी तसे न करतां तो आपल्या कचेरींत गेला व रुपया संध्याकाळीं बायकोला दिला.

ही गोष्ट घडल्यानंतर तीन चार दिवसांनीं उभयतांनां शिर्डीस जाण्याचा योग आला. दुसरे दिवशीं तीं बाबांच्या चरणापाशीं बसलीं असतां

बाबा म्हणाले, "बाई, लोक काय लबाड झाले आहेत. खिशात रुपया असून नाही म्हणून सांगतात" बाईला ह्या गोष्टीचा उलगडा झाला नाहीं. परंतु मित्राला फार नरस झाली व एक तऱ्हेचा आनंदही झाला कीं, बाबा आपल्या लहान सहान सर्व कृत्यावर सारखी नजर ठेवीत आहेत व त्यामुळे आपणांला त्याचें प्रत्यक्ष पाठबळ आहे.

एके वेळीं मुंबईस जाण्यासाठीं रजा घेतांना मित्राच्या डोळ्यांत अश्रु आले, तेव्हा बाबा म्हणाले, "हे काय वेडयावानी करतोस? मी तिकडे नाहीं का तुजपाशीं?" मित्र म्हणाला, "ते मला कळते पण अनुभव नाहीं." तेव्हां बाबा म्हणाले, "अरे, ज्याला वाटते कीं बाबा शिरडींत आहे त्याने बाबाला मुळींच नाहीं बघितले." अलबत मित्राला त्याचे आश्चर्य वाटलें. परतु तात्काळ त्याला बाबाचें बोलणें पटले कीं, खरे बाबांना पहाणे म्हणजे आत्मसाक्षात्कारी होणे.

एके वेळीं माझा मित्र व बाबा हे दोघेचजण मशिदींत होते. मित्र बाबाची सेवा करीत असता बाबांना हळूच म्हणाला, "बाबा, आपला वरदहस्त माझ्या शिरावर आहे तर आपण मला ह्या देहांतून आतां सोडवा." बाबा म्हणाले, "हे काय येडयावानी बोलतोस? अजून लय काम आहे." मित्र म्हणाला, "आपली मर्जी." ही गोष्ट तो कुणाही दुसऱ्यापाशीं अगर स्वतःच्या बायकोजवळ देखील बोलला नाहीं. त्यां नंतर सुमारे दोन वर्षांनीं बाबांनीं देह ठेविला. बाबा हयात असतांना, तसेंच देह सोडल्यानंतरही मित्र उगाच कुणाला सत्पुरुष सत्पुरुष म्हणून दुसऱ्या कुणाच्याही पाठिस लागला नाहीं. आणि असे करण्याचें त्याला श्री सांई माउलीच्या कृपेने कांहीं प्रयोजन उरले नाहीं. कर्मधर्मसंयोगानें त्याच्या मालकाचे सद्गुरू मालसरूचे महाराज ( जे गुजराथेंत श्री नर्मदेच्या कांठीं मठी बांधून होते ) ह्यांची गाठ मालकाचे घरीं झाली. नंतर महाराज मुंबईस आले असतां, मालकाच्या कारखान्यांत गेले. तेथें एका एकांत ठिकाणीं त्यांची व मित्राची गांठ झाली असतां मित्र बोलला, "महाराज, आप जैसे सत्पुरुषका वरदहस्त मेरे

सीरपर है तो मेरेकू ये देहमेसे छोडाना." महाराज तावडतोब बोलले "ये क्या पागलके माफक बात करते ! तेरा सद्गुरू का वचन ( बाबांचा विशिष्ट आशीर्वाद ) भूल गया ? अजू बोहोत काम है." हे ऐकून मित्राचे अंतःकरण गार झाले. बाबा जरी देह सोडून गेले तरी साक्षात् कसे खेळ खेळत आहेत हे अनुभवून घेऊन बाबांच्या पायीं मन लीन ठेवले असता काय गम्मत होते हें त्याला तात्काळ उमगले.

माझ्या मित्राला बाबांचे रूप व खेळ हें कांहीं काळपर्यंत कळेनात. ते कळण्यासाठीं त्याने जेव्हां श्री रामकृष्ण परमहंस, श्री भास्करानंद सरस्वती व त्रैलंग स्वामी इत्यादि महान सत्पुरुष जे थोड्या वर्षांपूर्वीं हयात होते, ह्यांची बंगाली भाषेत लिहिलेलीं चरित्रें वाचलीं, तेव्हां त्याला श्री साई महाराजांच्या अगाध लीलेविषयीं साधारण कल्पना येऊं लागली व सर्व तऱ्हेचे विकल्प नाहींसे झाले. प्रार्थनासमाजाच्या अननुभवी एकतर्फी व हेकेखोर शिकवणीने १५व्या वर्षापासून ते ४५व्या वर्षापर्यंत मनांत बसलेल्या परमेश्वर अवतार घेत नसतो या भावनेचा लोप झाला. परमेश्वर जर सर्व शक्तिमान् तर त्याला भक्तांसाठीं अवतार घेणें अशक्य कां ? जर सर्वव्यापी तर तो प्रत्येकाच्या अंतर्यामीं कां नसावा ? जर अंतर्यामीं आहे तर भक्ताला आत्मसाक्षात्कार होऊन ईश्वरपदापर्यंत का पोहोंचतां येऊं नये ? जर आधुनिक संतांच्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टी खऱ्या, तर जुन्या संतांच्या त्याच तऱ्हेच्या सर्व गोष्टी भाकडकथा व अतिशयोक्तीच्या कां ? मित्राचे अध्यात्मिक अध्ययन फारच स्वल्प. कारण तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबणारा निव्वळ मजूर. तरी पण महाभारताचें चिपळूणकरांचे मराठी भाषांतर, नाथाचें भागवत व भावार्थ रामायण ह्या ग्रंथांच्या वाचनाने उपनिषदांचा मथितार्थ व बाबांचा उपदेश व शिकवणी ह्यांचा त्याला उलगडा होऊं लागला.

इ. स. १९१७च्या दसऱ्यानंतर माझा मित्र बाबांचें दर्शन घेऊन मुंबईस येऊन नोकरीवर दाखल झाला. त्याच दिवशीं त्याच्या कारखान्याच्या मालकाच्या

मुलगा त्याला म्हणाला कीं त्याच्या वडिलांचे पत्र नाशिकहून आले आहे. तर मित्राने ताबडतोब शिर्डीस जाऊन बाबापासून प्रत्यक्ष खुलासा घ्यावा कीं त्याने नाशीकला राहावें, कीं मुंबईस जावें, अथवा शिर्डीस बाबाच्या दर्शनास यावें. त्या गृहस्थाला क्षयाची भावना होऊन त्याची स्थिति फारच बिघडली होती. त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांची इच्छा ही कीं, मुंबईस औषधोपचार होऊन तबियत सुधरेल. त्याची स्वतःची इच्छा ही कीं, शिरडीस बाबाच्या दर्शनास जावें. हे वडिलांचे पत्र संध्याकाळीं ५।५-१५ दर्म्यान आलें. मित्र म्हणाला, "मी आजच शिरडीहून आलों आहे. दीक्षीत तेथे आहेतच. तर त्याना पत्र पाठवून खुलासा मागवूं या." मुलगा म्हणाला कीं,"वडिलाची खास ही इच्छा आहे कीं मित्रानें शिर्डीस जाऊन बाबापसून प्रत्यक्ष खुलासा घ्यावा" त्यावेळीं तो शेटच्या मुलाला बोलला, " पहा आपण इकडे गोष्टी करीत आहोंत त्या सर्व बाबाना तिकडे शिर्डीस कळत आहेत. असो. तुमच्या वडीलाची इच्छा म्हणून मी आज रात्रीच्या गाडीने जातों." त्याप्रमाणे त्या रात्रीं कुटुंबासहित तो निघाला.

इकडे त्याच दिवशीं संध्याकाळीं ५।५-१५ वाजतां शिरडीच्या मशिदींत दीक्षीत वगैरे ३०-४० सद्गृहस्थ बाबांची सेवा करीत असतां बाबा एकएकी म्हणाले, " काय बाबासाहेब, काय काय गोष्टी चालल्या आहेत ? " पुन्हा, " काय विचार आहे, " " पुन्हा बरें बाबा." दुसरे दिवशीं सकाळीं नऊ दहा वाजतां मित्र शिर्डीस श्रीच्यापुढें हजर होतांच बाबा म्हणाले, " आलास, बरें झालें. काका ( दीक्षीतांस ) कालच संध्याकाळीं आपण याच्या गोष्टी काढल्या होत्या, नाहीं ? हें ऐकतांच मित्राचा गळा गहिंवरून आला, व विश्वासयुक्त बोलाला बाबा कसे तोलून धरतात हें सर्वांच्या दिग्दर्शनास आलें.

पुढे शेटच्या दुखण्याविषयीं व शिरडीस येण्याविषयीं विचारतां बाबा म्हणाले, " मुंबईस जाऊं नको, त्याला तेथेंच ( नाशिकास ) राहूं दे. ती लय चांगली जागा आहे, त्याला शांत राहूं दे. कोणी तरास देऊं नका. तिकडं

याचं बरं होईल. आपल्या पायीं चालला येईल." शेटची पुढे तबियत बरीच बिघडली. तो गृहस्थ कोट्याधीश शिकलेला, सवरलेला, विलायतेचा प्रवास करून आलेला, पण बाबांच्या बोलाचा खरा अर्थ स्वत: समजला. मन स्वस्थ करून ठेवलें. मृत्यू जवळ आलेला पाहून मुलें माणसे रडू लागलीं. त्यांना शांत पण स्वस्थ रीतीने सांगितलें; "मी तुमच्यासाठीं संसारांत पुष्कळ खस्ता काढल्या आहेत, तर आतां यावेळीं मला शांत चित्तानें असूं द्या. कोणाला रडायचे असेल तर त्याने खोलीबाहेर जावें." असें बोलून बाबांच्या चेहऱ्याकडे नजर लावून दोन हात जोडून "प्रभो हूं तारा पासे आवूं छूं." असे बोलून देह सोडला. हे जेव्हा कळलें तेव्हां बाबांच्या शब्दाचा उलगडा झाला. पायीं म्हणजे पायांनीं नव्हे तर आपल्या यत्नांनीं अथवा माझ्या पायांजवळ. सर्व बोलणें व शिकविणे अध्यात्मिक. इतका श्रीमंत मनुष्य, कितीतरी मोठा त्याचा व्यवसाय, पण काय तयारी! केवढी बाबांवर निष्ठा! किती शांत प्रकाराने व पूर्ण सावधगिरी ठेवून प्रभूच्या पायापाशीं अंतःकाळीं प्रयाण! बोलणे सोपे. वाचन व वायफळ बडबड आपणा प्रत्येकाला करतां येतें पण असा मृत्यु येणें हे कोट्यावधी माणसांतून किती जणांना तरी साधतें? धन्य त्या शेटजीची व धन्य साईबाबांची! जास्ती काय लिहावें? ह्या शेटनीं शिरडीस जाऊन महाराजाचे साक्षात् दर्शन केव्हांही घेतले नव्हतें ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. बाबा जाडया जाडया विद्वानांना तर अगम्य पण साध्य भोळ्या लोकांबरोबर अत्यंत प्रेमाने व अवखळपणे बोलत असत. माझ्या मित्राच्या धाकट्या मुलाबरोबर एके दिवशीं मोठा वाद जुपला. बाबा म्हणत 'तुझ्या घरीं येतांना आगगाडी आधीं लागते मग घर.' मुलगा म्हणे 'घर आधीं' नंतर गाडी. (गाडी घराच्या मागल्या बाजूने जाते)' मुलगा व्यवहारदृष्ट्या खरा, बाबा अध्यात्मदृष्टीने खरे. काहीं वेळाने मुलाची खात्री झाली कीं बाबा सरळ रेषेनें येणारे. त्यांना अलबत आधीं गाडी मग घर. त्यांना बसल्या ठिकाणाहून सर्व जगांतले व्यवहार दिसतात व कळतात; तर त्याच्या घरीं जाण्यासाठीं पुढच्या दारीं जाऊन दादर चढून वर माडीवर येण्याचें काय प्रयोजन?

५ व्यवहारी माणसांना व्यवहार देखील बाबांच्या दरबारांत कसा चोख-रीतीने झालेला पाहण्यांत येई! एकदां सर्व मंडळी मशिदींत श्री साई-

बाबाचे चरणापाशीं बसली असता, एक बाई सीताफळाची पाटी घेऊन बाबापाशीं आली. त्या दिवशीं प्रथमच सीताफळाचा हंगाम सुरू झाला होता. पाटींत सहा सीताफळे. बाबानीं किंमत विचारली. ती म्हणाली "एक रुपया." बाबा म्हणे "फार महाग, इतक्या किंमतीची आपणाला नकोत. सस्ती होतील तेव्हा घेऊं." बाईनें पाहिले बाबा घेईनात, (सुमारे अर्धा तास रगझक चालली होती) तेव्हा म्हणाली "बाबा, तुला वाटेल ती किंमत दे; मी बुध्या कुणालाही न विकता आधीं तुझ्या दरबारांत आणली" सरते-शेवटीं बाबानीं तीं सहा सीताफळे दहा आण्याला खरीद केलीं आणि तावडतोब सर्वांना वाटून टाकलीं.

थोडया वेळाने एक दुसरी बाई सीताफळांची टोपली घेऊन आली. पाटींत दहा सीताफळे. बाबा सीताफळें मुळींच घेईनात आणि म्हणाले, "मी आताच घेतलीं, आतां मला नको" सरतेशेवटीं बाईनें पुष्कळ काकुळती केल्यावर तीं दहा सीताफळे सहा आण्याला घेतलीं. व तीं तावडतोब वाटून टाकलीं. पहिल्या पाटीवालीला पैशासाठीं एका घंटा-भराने ये म्हणून सांगितले, त्याचप्रमाणें त्या दुसऱ्या बाईला सांगितलें. त्या-बायां कांहीं वेळानें आल्या व पैसे मागूं लागल्या. माधवराव जवळ बसले होते. त्याना बाबा म्हणाले, "शामा, या बायांनीं मला लय तरास दिला. कायरे यांचा हिशोब झाला?" माधवराव म्हणाले, "या बाईचीं देवा तूं सहा सीताफळें दहा आण्याला घेतलीस, आणि या दुसऱ्या बाईची दहा सीताफळे सहा आण्याला घेतलीस." "हं, तर मग काय हिशोब रे?" माधवराव म्हणाले, "दहा आणे आणि सहा आणे म्हणजे एक रुपया." मित्र जवळ बसला होता त्याला बाबा म्हणाले, "तुझ्याजवळ दोन रुपये आहेत काय?" मित्राने दोन रुपये खिशांतून काढून बाबांच्या स्वाधीन केले. बाबांनीं प्रत्येक बाईला एक एक रुपया दिला. हा सर्व प्रकार पाहून मित्राला स्वस्थ राहवेना. तो नम्रतेने बाबांना बोलला, "हें सर्व काय झाले मग मुळींच कळत नाहीं, विचारूं का?" बाबा, बोलले, "विचार." तेव्हां त्यानें ह्या सर्व गोष्टींचा खुलासा मागितला. बाब

म्हणाले, " हें बघ, जेव्हा बाजारात नवा माल येतो तेव्हां त्याला फार दाम पडतोना ?" तो म्हणाला "होय" "तेव्हां जपून खरीद करावे लागतेना ?" तो म्हणाला, "होय." "म्हणून आज नव्याने सीताफळें आलीं तेव्हां विचार करून खरीद केली. पुन्हा दुसरी पाटी आली, तेव्हां आपली गरज राहिली नव्हती. म्हणून भाव उतरला म्हणून कमी भावाने घेतली. तू असेच करतोस ना ?" मित्र म्हणाला, "होय" व आणखी म्हणाला, "त्याना (त्या बायाना) घंटाभराने ये म्हणून कां सांगितलें ?" बाबा बोलले, "अरे माल पारखून घ्यायचा असतो ना ?" नंतर मित्र म्हणाला, "त्या दोन्ही बायांना प्रत्येकी एक एक रुपया कां दिलात ?" बाबा बोलले, "अरे ते त्याच्या नशीबात होतें. आपल्यासाठीं येवढया कळकळीनें त्याना फळं आणलीं त्याचा बदला नको का त्यांना द्यायला ?" ह्याप्रमाणे व्यवहारीक ज्ञान व त्या सोबत पारमार्थिक देणे ह्या दोन्ही गोष्टी कितीतरी सूक्ष्मरीतीनें ह्या लहानशा गोष्टीवरून आपल्यासारख्या संसारी माणसांना शिकावयाच्या आहेत ! असे प्रकार बाबांच्या दरबारांत प्रत्यहीं पहावयास मिळत. वरवर पहाणारांस ते विचित्र व विसंगत दिसत.

माळसरच्या महाराजांच्या पायापाशीं माझा मित्र बसला असतां त्यानें एक स्वतःच्या डोळ्यानीं चमत्कार पाहिला; तो असा:—ही गोष्ट बडोदा मुक्कामीं त्याच्या यजमानाच्या घरांत वरच्या वरांडयामध्ये घडली. महाराज राणापुरीं जेव्हां गुहेतून बाहेर पडत तेव्हा दिगंबर स्थितींत असत. त्यांच्या शिष्यांपैकीं कोणीतरी त्याच्या अंगावर छाटी टाकीत असे. वरील घरीं एके दोन प्रहरीं महाराज एका आरामखुर्चीवर पडले होते. त्यावेळीं प्रेमानंद नांवाच्या प्रसिद्ध वकिलाची वृद्ध आई महाराजांच्या दर्शनासाठीं आली. ती महाराजांच्या खांद्याजवळ बसून गोष्टी करूं लागली. बोलतां बोलतां महाराजांचे संभाषण सर्व स्त्रीवाचक होऊं लागलें. महाराजांचे अंगावर छाटी होती. पण आंत दिगंबरस्थिति असल्याकारणानें व पाय खुर्चीच्या फळयांवर होते म्हणून पायांकडे बसलेल्या गृहस्थास त्यांचें इंद्रिय स्पष्ट दिसत होतें. त्या बाईबरोबर बोलतां बोलतां तें त्याचें इंद्रिय नाहींसे होऊन तेथें स्त्रीलिंग दिसूं लागलें. हें माझ्या मित्राने आपल्या डोळ्यानीं स्पष्ट पाहिलें व आश्चर्यचकीत होऊन शेजारच्या मंडळीस पाहण्यास सुचविलें.

ती बाई बोलत होती तोपर्यंत ही स्थिति होती तिनें महाराजांची रजा घेतांक्षणींच महाराजाची स्थिति पूर्ववत् झाली. माझ्या मित्राच्याने राहवेना. त्याने महाराजांस विचारिले, "ये कैसा हुवा ?" महाराज जावेच्या दोन्ही बाजूंकडे बोटे दाखवून म्हणाले, "यहा नस है. ओ जब स्त्रीभावना होती है तब खेच जाते है और स्त्रीरूप होता है." महाराज जुवानपणी असताना श्री रामकृष्ण परमहंस याना बच्चा असलेले पाहिलेले सांगत. यावरून त्यांच्या उमरीची साधारण कल्पना होईल. अशा पूर्ण योग्याला मित्राने खंडयोगाविषयीं विचारले. त्यानीं सांगितले कीं खंडयोग खरा आहे. आपण या देहांत अनुभवलेला नाही. पण पुढल्या देहात त्याचा पूर्ण अनुभव घेऊं. ह्या त्यांच्या शब्दांवरून बाबांच्या देहाचें तुकडे झालेले ज्यानीं पाहिले, ती हकीकत खरी ठरते.

हे महाराज १९२१ सालीं समाधिस्थ झाले. समाधि घेण्यापूर्वी दोन दिवस शेट विठ्ठलदास चत्रुभूज हिऱ्याचे व्यापारी व इतर मंडळीसमोर महाराज स्पष्ट बोलले कीं ते एक २० वर्षांच्या जुवान तरुणाचा देह धारण करणार आहेत. यावरून श्री साईबाबांचे अयोनिसंभवत्व स्पष्ट कळून येतें.

ह्या सर्व स्थिति वाचकांपुढे स्पष्टरीतीने मांडून श्री साई माउलीच्या अगाध लीलेविषयीं माहिती व्हावी ह्या हेतूनेच वरील दाखले दिले आहेत. अशा बाबतींत तुलना करणें ही गोष्ट केवळ गौण व निंद्य.

मित्राला व मला श्री साई माउलीच्या चरणापाशीं अनेक गोड अनुभव आले आहेत व श्रींच्या देहपातानंतरही येत आहेत. परंतु मी आपला वेळ घेऊं इच्छित नाही.

श्री साइमाउलीने पदरांत घेऊन साक्षात् दर्शन देऊन कृतार्थ केलें व ह्यामुळें पायापाशीं बसणाऱ्या कोणाही बाळकास प्रेमाचा उमाळा येऊन धन्य वाटणें हें साहजिक आहे !

लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

**रा. आ. तर्खडकर.**

## शिर्डी येथील शके १८४६च्या श्री गोकुळअष्टमीच्या उत्सवाबद्दल वर्गणी आली तिचा जमाखर्च श्रावण वद्य २ ते श्रावण वद्य ९ पर्यंत.

| जमा | नांवें |
| --- | --- |
| वर्गणी आली ती. | १२॥ गरीबांस कपडे वाटण्याकरिता |
| ५ रा. रा त्रिंवक आनंदराव कर्णीक मनीआर्डर | ४८॥ न्यासलेट हवा |
| | १ निंच्या व हळद मिळून |
| ५ ,, ,, लक्ष्मण गोविंद मुगी ता. २७।८।२३ | -॥≈ नेण्यास तार सामान आणण्यास भाडें -।- -।= |
| २ ,, ,, नायब आमीन होळकर स्टेट | ६ निमंत्रणपत्रें पाठविण्यास तिकीटें |
| ५ ,, ,, गोवर्धन गीरधर | २३८- राहाते येथून सामान खरेदी हस्ते बाळा |
| ५ ,, ,, व्ही. कृष्ण पाध्ये २९।८।२३ | |
| २ ,, यशवंतराव जनार्दन गाळवणकर | ४१॥।≈॥ मुलतानचंद याचे सामानाबद्दल दिले. |
| ४४॥≈ रा. पालनजी आदरजी तारापुरवाला हस्ते काकासाहेब. | ९॥≈ श्रींचे देवस्थानाबद्दलचे बिल |
| ५ रा रामचंद्र वामन मोडक सांगली | ५ प्रसाद पाठविणे व तिकिटें रुपये टपाल खर्च. |
| १० श्री. अण्णासाहेब याजकडून | ९७८= गहू रूपानें वर्गणी आली ते गहू खर्ची पडले सबब नावें |
| ५ रावसाहेब विनायक गणेश देशपांडे. | ६० गुळ रूपानें वर्गणी आली ती पक्के दर ३० प्रमाणें गुळ खर्च झाला. |
| ५ डॉ. हिरालाल क्लार्क | |
| १० | १७ गुळ खरेदी शेर ८८६८ |
| ३ रा. वामन चिंतामण मुके | २४। तांदूळ रूपानें वर्गणी आली ती |
| ३ रा रा पुरुषोत्तम रघुनाथ आवस्ती | ४॥≈ धर्मादाय वाटण्याकरिता |
| ८८- श्रींचे पेटीत निघालेलें उत्पन्न दिवस ३ धान्य रूपानें व गुळ व गहू रूपानें आलेली वर्गणी | ३।-॥ श्री. अण्णासाहेब याचा खर्च |
| २१ तात्या पाटील गहू मण ८१ रोख ७ गुळ १४ | १८- कार्डे पाठविणें टपालखर्च |
| ५ तुकाराम पाटील. गुळ | १॥ लेबलची किंमत |
| ५ दाजी वामन चितांबर गुळ | -॥- लेबलस् |
| ६ बाळा बापु जगताप. गुळ | ८≈॥ लेबलचा टपालखर्च |
| | ३-।-॥ |

६ तात्या बापु जगताप गुळ
३॥ विठोबा कोते. रोख, गुळ

७ त्रिबक शेळके गहू पायली ८८८
१३॥ बाबुराव गोंदकर गहू पा.८८८
७
गुळ ६॥
५। तुकाराम पांडू कोते गहू पा. ८८६
७-काशीनाथ गांधी राहतेकर गहू ८८८
७ पेमराज विरदीचद राहातेकर गहू ८८८
७ दौलतराम शेट राहातेकर गहू ८८८
१५ यशवतराव पुणेकर गुळ शेर ८८६०
६॥. जयराम कोते गुळ शेर ८८२६
.॥।≈ गेनु गोंदकर गहू पायली ८८१
१०॥ मुलतानचद रोख गूळ ६॥. तांदूळ ४
२॥।. गुळवे पुणेकर तांदूळ पायली ८८२
१।- राम खडू गोंदकर तांदूळ पायली ८८१
५ मामा पुणेकर तांदूळ पायली ८८४
६। रंभा धनगर तांदूळ पायली ८८५
१० रामचंद्र दादा पाटील गुळ रूपानें
३३ पुनमचद शेट गहू मण ८२ गुळ ५
२८
५ रूपचद शेट तांदूळ पायली ८८४
१४ बाळा पुणेकर गहू मण ८१
३० भर्डाविक्री मण ८२ दर १५ प्रमाणें
त्याजबदल जमा पुण्यतिथी कडून
८॥। पत्रावळी पुण्यतिथीकडे विक्री.

३३९॥।≈

६ सर्पण मण ८१५ दर ८ रुपये प्रमाणें
२॥ भर्डा शिजविण्याबद्दल मजूरी
१ गर्डी २ ची मजूरी

३१९॥।-॥। एकूण खर्च.

२०८-। शिल्लक

३३९॥।≈

श्री समर्थाचे चरणीं विनती आहे कीं, आपले भक्तांना व आपले उत्सवास ज्यानीं मदत केली त्यास परलोकाचा उत्तम आशिर्वाद असावा श्रीचे चरणीं आणखी विनती आहे कीं, वेळोवेळीं उत्सवाचे प्रसगीं हजर राहाण्यास व सस्थेस कायम फड जमा करण्यास सर्व भक्ताना प्रेरणा करावी. तारीख ७।१२।२४.

आपला चरणरज

**तात्यापाटील कोते**

**रामचंद्र दादापाटील कोते**

# अध्याय २७ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

दृढ धरिल्या श्रीसद्गुरुचरण । घडे ब्रह्मादित्रैमूर्तिनमन ॥
साक्षात्परब्रह्माभिवंदन । स्वानंदघन सुप्रकट ॥ १ ॥
मारितां एका सागरीं बुडी । साधती सकल तीर्थपरवडी ॥
बैसतां गुरुपदीं देऊनि दडी । आतुडती बुडीं[1] सकल देव ॥ २ ॥
जयजयाजी साई सद्गुरू । जयजयाजी सायुज्यकल्पतरू ॥
जयजयाजी निजबोधसागरू । कथेसीं आदरू उपजवीं ॥ ३ ॥
मेघोदकालागीं चातक । तैसे तव कथामृता भाविक ॥
सेवोत तुझे भक्त सकौतुक । पावोत सुख सदैव ॥ ४ ॥
परिसतां तव कथा निर्मळ । स्वेद अंगीं फुटो निखळ[2] ॥
नेत्रीं दाटो प्रेमजळ । प्राण पांगुळला राहो ॥ ५ ॥
मना येवो गहिंवर । रोमांच उठोत वरचेवर ॥
रूदन स्फुंदन वारंवार । घडो सपरिवार श्रोतयां ॥ ६ ॥
तुटून जावोत परस्परविरोध । सानथोर भेदाभेद ॥
हाच गुरुकृपावबोध । करावा शोध अंतरीं ॥ ७ ॥

---

१ सागराचेतळीं. २ सर्वत्र.

येई न हा दृष्टी दावितां । सर्वेंद्रियां याची अगोचरता ॥
सद्गुरूवीण याचा दाता । न मिळे धुंडितां त्रिभुवनीं ॥ ८ ॥

कामादि षड् विकारोपशम । भक्तिभाव निःसीम प्रेम ॥
नुपजतां गुरुपदीं निष्ठा परम । होई न उद्गम अष्टभावां ॥ ९ ॥

भक्ताचे जें निजसुख । तेणेंचि गुरूसि परम हरिख ॥
भक्त जों जों परमार्थोन्मुख । तों तों कौतुक गुरूतें ॥ १० ॥

देह गेह पुत्र जाया । मी माझें हा व्याप वाया ॥
ही तों सर्व क्षणिक माया । जैसी छाया दुपारची ॥ ११ ॥

बाधूं नये मायेची गुंती । ऐसें जरी असेल चित्तीं ॥
अनन्यभावें साईप्रती । शरणागती संपादा ॥ १२ ॥

लावावया मायेचा अंत । वेदशास्त्रीं टेकिले हात ॥
पाहील जो मूर्ती भगवंत । तोचि तो निश्चित तरेल ॥ १३ ॥

सोडूनियां निजामशाई । धन्य तो पाटील चांदभाई ॥
सवें घेऊनि फकीर साई । आरंभीं येई नेवांसिया ॥ १४ ॥

तेथें वर्ष सहा मास । फकीराचा होई निवास ॥
तेथेंच कानड गांवींच्या कमास । सहवासास ठेवियले ॥ १५ ॥

असो पुढें प्रसिद्ध टाकळी । घेऊन तेथिल दगडू तांबोळी ॥
कमा बाबासमवेत ही मंडळी । तेथून आली शिर्डीस ॥ १६ ॥

जागोजागीं अपरिमीत । पवित्र स्थळें तीर्थें बहुत ॥
परी साईच्या भक्तांमत । शिरडीच अत्यंत पवित्र ॥ १७ ॥

जरी न दैवें येता हा योग । कैचा मग हा महाभाग ॥
आम्हा दीनां हा संयोग । महद्भाग्य हे अमुचें ॥ १८ ॥

---

१ हर्ष. २ गृह. ३ गुतागुत. ४ नेवाशात. ५ हा साई समागम.

जे जे भक्त शरणागत । साधावया तत्कार्यार्थ ॥
साई तयांस दावी यथार्थ । सन्मार्गहितार्थ तयांच्या ॥ १९ ॥

तरी श्रोतां एकाग्रमन । होऊनि करा सच्चरितावर्तन ॥
तें हें परम गुरुकृपासाधन । चरित्र पावन साईचें ॥ २० ॥

गताध्यायीं निरूपण । एकास निजगुरुपदीं स्थापन ॥
अक्कलकोट स्वामीची खूण । एकास देऊन जागविलें ॥ २१ ॥

एकाचा चुकविला आत्मघात । युक्ति योजून अकल्पीत ॥
जीवदान दिधलें क्षणांत । ओढंवला देहांत टाळुनी ॥ २२ ॥

आतां या अध्यायीं कथन । कधीं साई कैसे प्रसन्न ॥
होऊन करीत अनुग्रहदान । सुखसंपन्न भक्तांस ॥ २३ ॥

दीक्षा प्रकार तो अद्भूत । कैसा कवणालागीं होत ॥
विनोद पूर्ण हांसत खेळत । श्रोते परिसोत सावचित्त ॥ २४ ॥

उपदेशाच्या अनेक रीती । मागां वर्णिल्या येच ग्रंथीं ॥
जैसी ज्याची ग्राहकस्थिती । मार्ग उपदेशिती तैसाच ॥ २५ ॥

वैद्य जाणे रोगाचें निदान । तयास ठावा मात्रेचा गुण ॥
रोग्यास नाहीं त्याची जाण । आधीं आण गूळ म्हणे ॥ २६ ॥

गूळ गोड परी अपकारी । रोगी तदर्थचि हट्ट धरी ॥
घेई न वाटी औषधाची करीं । गूळ करावरि न ठेवितां ॥ २७ ॥

चाले न रुग्णावरा सक्ती । वैद्य तेव्हां युक्ति योजिती ॥
आधीं गूळ मग औषध देती । परी साधिती निजकार्य ॥ २८ ॥

मात्र अनुपान तेवढें बदलती । जेणें गुळाचे दोष हरपती ॥
योजिलीं औषधें कार्यक्षम होती । तेच कीं रीती बाबांची ॥ २९ ॥

---

१ ओढवलेला २ जाणीव. ३ रोगी.

हाच नव्हे सर्वत्र नियम । अधिकार आणि मनोधर्म ॥
जैसी सेवा भक्त प्रेम । तैसाच उपक्रम अनुग्रहा ॥ ३० ॥
नवल बाबांची अद्भुत कृती । जेव्हां कोणा प्रसन्न होती ॥
तया मग ते अनुग्रह देती । कवण्या स्थिती तें परिसा ॥ ३१ ॥
आलें एकदां तयांचे चित्ता । ध्यानीं मनीं कोणाच्या नसतां ॥
सहज थट्टा विनोद करतां । भक्त कृतार्थता साधीत ॥ ३२ ॥
इच्छा उद्भवतां ग्रंथवाचनीं । सहज येई भक्तांच्या मनीं ॥
ग्रंथ बाबांच्या हातीं देऊनि । प्रसाद म्हणूनि तो घ्यावा ॥ ३३ ॥
पुढें मग त्या ग्रंथाचें वाचन । केलिया होईल श्रेय संपादन ॥
श्रोत्या वक्त्याचें परम कल्याण । प्रसादपूर्ण श्रवण तें ॥ ३४ ॥
कोणी दशावतार चित्रें । कोणी दशावताराचीं स्तोत्रें ॥
कोणी पंचरत्नी गीतेसम पवित्रें । पुस्तकें चरित्रें अर्पीत ॥ ३५ ॥
दासगणूही संतलीलामृत । भक्तलीलामृतही अर्पीत ॥
कोणी विवेकसिंधू ग्रंथ । बाबा ते देत शामातें ॥ ३६ ॥
पुस्तकें शामा हीं तुजला व्हावीं । म्हणती घरीं बांधून ठेवी ॥
शामानें आज्ञा शिरीं वंदावी । पुस्तकें रक्षावीं दप्तरीं ॥ ३७ ॥
आणूनि ऐसें भक्त मनीं । ग्रंथ आणीत दुकानांतुनी ॥
कीं बाबांचे हातीं देउनी । प्रसाद म्हणूनी मागावे ॥ ३८ ॥
स्वभाव बाबांचा जरी उदार । हेंही कराया लागे धीर ॥
नेती माधवरावांस बरोबर । करिती समोर तयांसी ॥ ३९ ॥
तयां करवीं बाबांचे हातीं । समय पाहूनि ग्रंथ देती ॥
बाबांस जैसी ग्रंथांची महती । तैसीच भक्त स्थिति ठावी ॥ ४० ॥
भक्तांनीं द्यावे ग्रंथ करीं । बाबांनीं चाळावे वरचेवरी ॥
भक्तांनीं घ्याव्या ते माघारी । हस्त पुढारीं धरावे ॥ ४१ ॥

परी न बाबा तयांते देती। ते तो देती माधवरावाप्रती॥
म्हणत शामा ठेव याप्रती। असूं दे संप्रती तुजपाशीं॥ ४२॥

शामानें पुसावें स्पष्टोक्ती। हे जे आतुरते हात पसरती॥
त्यांच्या त्यांस देऊं का प्रती। तरी ते वदती तूं ठेव॥ ४३

एकदां भक्त काका महाजनी। आवड जयांस भागवत वाचनीं॥
सवें ग्रंथाची प्रत घेउनी। शिरडी लागूनि पातले॥ ४४॥

माधवराव भेटूं आले। वाचूं म्हणून पुस्तक उचललें॥
हातीं घेऊनी मशीदी गेले। सहज पुसियेलें बाबांनीं॥ ४५॥

शामा हें हातीं पुस्तक कसलें। शामानें तें निवेदन केलें॥
बाबांनीं तें हातीं घेतलें। परत केलें पाहून॥ ४६॥

हेंच पुस्तक हीच प्रत। हेंच नाथांचें भागवत॥
होतें श्रीकरप्रसादप्राप्त। महाजनीप्रत पूर्वींच॥ ४७॥

ग्रंथ नव्हे तो मालकीचा। आहे काका महाजनींचा॥
वाचूं तात्पुरता जाहली इच्छा। स्पष्ट वाचा कळविलें॥ ४८॥

तरीही बाबा वदती तयांला। ज्याअर्थी म्यां हा तुज दिधला॥
ठेव तूं अपुले संग्रहाला। येईल कामाला दप्तरीं॥ ४९॥

असो पुढें कांहीं काळें। पुनश्च काका शिरडीस आले॥
सवें आणिक भागवत आणिलें। हस्तीं ओपिलें साईंच्या॥ ५०॥

प्रसाद म्हणून माघारा दिधलें। नीट जीव लाव आज्ञापिलें॥
कीं ते जिवाभावाला अपुले। येईल आश्वासिलें काकांस॥ ५१॥

"हेंच कामीं येईल अपुले। नको देऊं हें कोणास वहिलें॥
ऐसें मोठ्या कळकळीनें कथिलें। सप्रेम वंदिलें काकांनीं॥ ५२॥

१ उत्कंठेनें. २ श्रीसाईबाबाच्या हाताने प्राप्त झालेलें. ३ माधवरावांला ४ काका महाजनी.

बाबा स्वयें अवाप्तकाम। पदार्थमात्रीं पूर्ण निष्काम ॥
भागवत जयांचा आचरता धर्म। संग्रहश्रम किमर्थ ॥ ५३ ॥

कोण जाणें बाबांचे मन। परी हें ग्रंथांचें संमेलन ॥
व्यवहारदृष्ट्या अति पावन। श्रवण सायन निजभक्तां ॥ ५४ ॥

शिरडी आतां स्थान पवित्र। देशीदेशींचे बाबांचे छात्र ॥
होतील वेळोवेळीं एकत्र। ज्ञानसत्र मांडितील ॥ ५५ ॥

तेव्हां हे ग्रंथ येतील कामा। दप्तरांतून दावील शामा ॥
स्वयें आपण जाऊं निजधामा। ग्रंथ प्रतिमा होतील ॥ ५६ ॥

ऐसे हे ग्रंथ परम पावन। असो शिरडी वा अन्य स्थान ॥
वाचितां भक्तास व्हावी आठवण। संग्रह कारण असेल हें ॥ ५७ ॥

असो रामायण वा भागवत। परमार्थाचा कोणताही ग्रंथ ॥
वाचितां रामकृष्णादिकांचें चरित। साईच दिसत मागें पुढें ॥ ५८ ॥

वाटे या ग्रंथांच्या विभूति। साईच नटला ते ते स्थिति ॥
श्रोते वक्ते नित्य देखती। समोर मूर्ति साईची ॥ ५९ ॥

ग्रंथ करिती गुरूस अर्पण। किंवा ब्राह्मणा करिती दान ॥
त्यांतही आहे दात्याचें कल्याण। शास्त्र प्रमाण ये अर्थी ॥ ६० ॥

हें काय स्वल्प प्रयोजन। कीं जें शामास बाबांचें नियोजन ॥
त्वां हें ग्रंथ गृहीं नेऊन। दप्तरीं संरक्षण करावें ॥ ६१ ॥

जैसा शामा भक्त निःसीम। तैसेंच तयावर बाबांचें प्रेम ॥
तयास लावावा कांहीं नियम। उदेला काम साई मनीं ॥ ६२ ॥

तंव ते पहा काय करिती। जरी शामाची इच्छा नव्हती ॥
तरी तयावरी अनुग्रह करिती। कवण्या स्थिती तें परिसा ॥ ६३ ॥

---

१ ज्याचे सर्व इच्छित प्राप्त झालेले आहे असे. २ शिष्य.

एके दिवशीं मशीदीशीं । बुवा एक रामदासी ॥
होता नित्यनेम तयासीं । रामायणासीं वाचावें ॥ ६४ ॥
प्रातःकाळीं मुखमार्जन । स्नानसंध्या भस्मचर्चन ॥
करोनि भगवें वस्त्र परिधान । अनुष्ठान मांडावें ॥ ६५ ॥
विष्णुसहस्रनामावर्तन । मागून अध्यात्मरामायण ॥
पारायणावरी पारायण । श्रद्धापरिपूर्ण चालावें ॥ ६६ ॥
ऐसा कितिएक काळ लोटता । माधवरावांची वेळ येतां ॥
आलें साईसमर्थांचे चित्ता । काय ती वार्ता परिसावी ॥ ६७ ॥
फळली माधवरावांची सेवा । लावावा कांहीं नियम जीवा ॥
भक्तिमार्गाचा प्रसाद व्हावा । लाहो विसावा संसारीं ॥ ६८ ॥
ऐसें बाबांचे आलें मनीं । रामदासास जवळ बोलावुनी ॥
म्हणती पोटांत आली कळ उठुनी । आंतडी तुटूनि पडत कीं ॥६९॥
जा, ही राही न पोटदुखी । आणकीं सत्वर सोनामुखी ॥
मारिल्याविण थोडीसी फकी । जाई न रुखरुखी पोटाची ॥ ७० ॥
रामदास विचारा भावार्थी । खूण घालून ठेविली पोथी ॥
गेला धांवत बाजाराप्रती । आज्ञावर्ती बाबांचा ॥ ७१ ॥
रामदास खालीं उतरले । इकडे बाबांनीं काय केलें ॥
तात्काळ आसनावरूनि उठले । जवळ गेले पोथीच्या ॥ ७२ ॥
तेथें इतर पोथ्यांत होती । विष्णूसहस्रनामाची पोथी ॥
उचलून बाबांनीं घेतली हातीं । आले मागुती स्वस्थाना ॥ ७३ ॥
म्हणती "शामा ही पोथी कंनी । आहे पहा बहुगुणी ॥
म्हणून देतों तुजलागुनी । ती त्वां वाचून पहावी ॥ ७४ ॥

१ बारीक चावटी. २ या नांवाने माधवरावांस बाबा हाक मारीत.
३ कीं नाहीं. ४ फार कल्याणकारी.

एकदां मज उपजली नड । काळीज करूं लागलें धडधड ॥
झाली जीवाची चडफड । दिसे न धडगत माझी मज ॥ ७५ ॥

गेसिया त्या प्रसंगाला । काय सांगूं शामा मी तुजला ॥
या पोथीचा जो उपयोग झाला । हा जीव तरला तिचेनीं ॥ ७६ ॥

अणेक उरीं निसावा दिला । तात्काळ हा जीव गार झाला ॥
अल्लाच वाटे पोटीं उतरला । जीव हा जगला तिचेनी ॥ ७७ ॥

म्हणोनि शामा ही तुजला नेई । ओजे ओजे वाचीत जाई ॥
रोज एकादें अक्षर घेई । आनंददायी ही मोठी" ॥ ७८ ॥

शामा म्हणे ही मजला नलगे । रामदास मज भरेल रागें ॥
तो म्हणेल मीच त्याचे मागें । कर्म वांत्रुगें हें केलें ॥ ७९ ॥

आधींच तो जातीचा पिसाट । माथेफिरू तापट खाष्ट ॥
किमर्थ व्हावी ही कळ फुकट । नको कटकट ही मातें ॥ ८० ॥

शिवाय पोथीची लिपी संस्कृत । माझी वाणी रांगडी कुश्चित ॥
जोडाक्षरही न जिव्हेस उलटत । उच्चार स्पष्ट होई न मज ॥ ८१ ॥

पाहूनि बावांचें कृत्य सकळ । बावा लाविती वाटलें कळ ॥
बावास शामाची केवढी कळकळ । शामास अटकळ नाहीं ती ॥ ८२ ॥

माझा शामा असेल खुळा । परी मजला तयाचा ळळा ॥
लोभ लावी जीवा आगळा । तयाचा कळवळा मज मोठा ॥ ८३ ॥

ही विष्णुसहस्त्रनाममाळा । बांधीन स्वहस्तें तयाचे गळा ॥
करीन तया भवदुःखा वेगळा । लावीन चाळा वाणीला ॥ ८४ ॥

---

१ पीडा. २ या विष्णूसहस्त्रनामाचा. ३ छातीवर, हृदयांत. ४ परमेश्वर. ५ हळूहळू. ६ खोटें (म्हणजे त्याचे परवानगी खेरीज त्याची पोथी घेणे हे). ७ वेडा.

नाम पापाचे पर्वत फोडी । नाम देहाचें बंधन तोडी ॥
नाम दुर्वासनेच्या कोडी । समूळ द्वडी लोटुनी ॥ ८५ ॥

नाम काळाची मान मोडी । चुकवी जन्ममरण ओढी ॥
ऐसि या सहस्त्र नामाची जोडी । शाम्यास गोडी लागावी ॥ ८६ ॥

नाम प्रयत्नें घेतां चोखट । अप्रयत्नेंही नाहीं ओखट ॥
मुखासि आलें जरी अवचट । प्रभाव प्रकट करील ॥ ८७ ॥

नामापरीस सोपें आन । अंतःशुद्धीस नाहीं साधन ॥
नाम जिव्हेचें भूषण । नाम पोषण परमार्था ॥ ८८ ॥

नाम घ्यावया नलगे स्नान । नामासि नाहीं विधि विधान ॥
नामें सकळ पाप निर्दळण । नाम पावन सर्वदां ॥ ८९ ॥

अखंड माझेंही नाम घेतां । बेडा पार होईल तत्त्वतां ॥
नलगे कांहीं इतर साधनता । मोक्ष हाता चढेल ॥ ९० ॥

जया माझे नामाची घोकणी । झालीच तयाचे पापाची धुणी ॥
तो मज गुणियाहुनि गुणी । जया गुणगुणी मन्नामीं ॥ ९१ ॥
हेंच बाबाचें मनोगत । तदनुसार मग ते वर्तत ॥
शामा जरी नको म्हणत । बाबा तें सारीत खिशांत ॥ ९२ ॥
वाडवडिलांची पुण्याई सबळ । तेणेंच साईकृपेचें फळ ॥
ऐसें हें सहस्त्रनाम निर्मळ । प्रपंच तळमळ वारील ॥ ९३ ॥

इतर कर्मा लागे विधि । नाम घ्यावें कधींही निरवधीं ॥
तया न अनध्याय प्रदोष बाधी । उपासना साधी नाहीं दुजी ॥ ९४ ॥
नाथांनींही येच रिती । एका अपुल्या शेजारियावरती ॥
हेंच सहस्रनाम मारोनि माथीं । परमार्थपंथीं सूदिलें ॥ ९५ ॥

---

१ सतत व हळूं जप ( गुणगुण ).

नाथाघरीं नित्य पुराण । शेजारी जातीचा ब्राह्मण ॥
होता स्नानसंध्या विहीन । दुराचरण निमग्न ॥ ९६ ॥

कधीं करीना पुराण श्रवण । वाड्यांत पाऊल ठेवीना दुर्जन ॥
नाथ होऊनिया सकरुण । केलें पाचारण तयास ॥ ९७ ॥

उंचवर्णीं असोनि जन्म । वाया जातो हें जाणोनि वर्म ॥
नाथांस उपजली कृपा परम । कैसा हा उपरम पावेल ॥ ९८ ॥

म्हणोन तयाने नको म्हणतां । सहस्त्रनामाची दिधली संथा ॥
एकेक श्लोक पढवितां पढवितां । निजोद्धारता लाधला ॥ ९९ ॥ *

या सहस्त्रनामाचा पाठ[१] । चित्तशुद्धीचा मार्ग धोपट ॥
परंपरागत हा परिपाठ । तेणेंच ही ओटाट बावांना ॥ १०० ॥

तों आले रामदास जल्द । घेऊनि सोनामुखी अँगद ॥
अँण्णा उभेच कळीचे नारद । वृत्तांत साद्यंत कळविला ॥ १०१ ॥

आधींच रामदास आर्तताई । वरी नारदाची शिष्टाई ॥
मग त्या प्रसंगाची अपूर्वाई । कोण गाईल यथार्थ ॥ १०२ ॥

आधींच रामदास विकल्पमूर्ति । माधवरावाचा संशय चित्तीं ॥
म्हणे बळकावया माझी पोथी । बावांना मध्यस्ती घातलें ॥ १०३ ॥

सोनामुखीची वार्ता विसरला । माधवरावावरी घसरला ॥
वृत्तिप्रकोप अनावर झाला । उदंड वरसला वाग्डंबर ॥ १०४ ॥

पोटदुखीचें हें ढोंग सगळें । तुवांच बाबांस उद्युक्त केलें ॥
माझ्या पोथीवर तुझे डोळे । हें न चाले मजपुढें ॥ १०५ ॥

---

* केशवस्वामीकृत श्री एकनाथस्वामीचें चरित्र अ. २७ ओ० ३४ ते ७१ पहा.

१ धडपड. कळकळ. २ औषध ३ कै वा. अण्णा चिंचणकर (दामोदर घनःशाम बाबरे ). ४ फार रागीट. ५ कुतर्कांची प्रतिमा.

नांवाचा मी रामदास निधडा। पोथी न देतां गुणांधडा॥
पहा हें मस्तक फोडीन तुजपुढां। धालीन सडा रक्ताचा॥ १०६॥

तुझा माझे पोथीवर डोळा। स्वयेंच रचूनिया कवटाळा॥
घालिसी सकळ बाबांचे गळां। नामानिराळा राहून॥ १०७॥

माधवराव बहु समजाविती। रामदासा नाहीं शांती॥
तंव माधवराव सौम्य वृत्ति। काय वदती तें परिसा॥ १०८॥

मी कपटी हा माझे माथां। मारूं नको रे प्रवाद वृथा॥
काय तुझ्या त्या पोथीची कथा। नाहीं दुर्मिळता तियेला॥ १०९।

तुझ्याच पोथीला काय सोनें। किंवा हिरकणी जडली नेणें॥
बाबांचाही विश्वास जेणें। धरिसी न जीणें धिक् तुझें॥ ११०॥

पाहूनि तयाचा अट्टाहास। बाबा मधुर बोलती तयास॥
काय बिघडलें रे रामदास। व्यर्थ सायास कां वहासी॥ १११॥

अरे शामा आपलाच पोरगा। तूं कां शिरा ताणिसी उगा॥
किमर्थ इतका कष्टसी वाउगा। तमाशा जगा दाविशी॥ ११२॥

ऐसा कैसा तूं कलहतत्पर। कां न बोलवे मधुरोत्तर॥
अरे ह्या पोथ्या पढतांही निरंतर। अजुनि अंतरें अशुद्ध॥ ११३॥

प्रत्यही अध्यात्मरामायण पढशी। सहस्रनामाचें आवर्तन करिशी॥
तरी ही उच्छृंखलवृत्ती न त्यजिसी। आणि म्हणविशी रामदास ११४

ऐसा कैसा तूं रामदास। तुवां सर्वार्थीं असावें उदास॥
परी तुटेना पोथीचा सोस। काय या कर्मास सांगावें॥ ११५॥

रामदासीं नसावी ममता। सान थोरीं असावी समता॥
त्या तुझी या पोरासीं विषमता। झोंबसी हाता पोथीस्तव॥ ११६॥

---

१ घडयागुणानीं. २ कपटविद्या. ३ द्वेष. ४ मन. ५ लोभ.

जा बैस जाऊन स्थानावरी । पोथ्या मिळतील पैशा पासरी ॥
माणूस मिळेना आकल्पवरी । विचार अंतरीं राखावा ॥ ११७ ॥

तुझ्या पोथीची काय महती । शाम्याला त्यांत कैंची गती ॥
उचलली ती म्यांच आपमतीं । दिधली तयाप्रति मीच ती ॥ ११८ ॥

तुला ती तों मुखोद्गत । शाम्यास द्यावी आलें मनांत ॥
वाचील ठेवील आवर्तनांत । कल्याण अत्यंत होईल ॥ ११९ ॥

काय त्या वाणीची रसाळता । मधुरता आणि कनवाळुता ॥
तैसीच स्वानंदजळ शीतळता । अति अपूर्वता तियेची ॥ १२० ॥

रामदास उमगला चित्ता । म्हणे माधवरावास फणफणतां ॥
घेईन बदला पंचरत्नी गीता । हे तुज आतां सांगतों ॥ १२१ ॥

रामदास इतुका निवळला । माधवरावास आनंद झाला ॥
एकच काय मी दहा तुजला । गीता बदला देईन ॥ १२२ ॥

असो पुढें तो तंटा निवाला । गीताग्रंथ जामीन राहिला ॥
देव गीतेचा ज्यातें न कळला । गीता कशाला तयास ॥ १२३ ॥

साईसन्मुख अध्यात्मरामायण । पाठावर पाठ करी जो जाण ॥
त्या रामदासें साईसी तोंड देऊन । करावें भांडण कां ऐसें ॥१२४॥

हें तरी म्यां कैसें वदावें । दोष कोणास कैसे द्यावे ॥
झाले ते प्रकार जरी न व्हावें । महत्व ठसावें कैसेंनी ॥ १२५ ॥

इतुका झगडा लाविला ज्यानें । बावांचेंही घालविलें दुखणें ॥
कल्याण आहे माझे जेणें । अलौकिक देणें साईचें ॥ १२६ ॥

जरी न होता हा सायास । वसता न माधवरावाचा विश्वास ॥
खरेंच चढतें न अक्षर जिव्हेस । पाठचि तयांस होतें ना ॥ १२७ ॥

१ रागाने तांबडालाल होऊन. २ नड, पिडा.

ऐसा हा साईनाथ प्रेमळ । खेळिया परमार्थाचा दुर्मिळ ।
दावील केव्हां कैसी कळ । करणी अकळ तयाची ॥ १२८ ॥

पुढें शामाची निष्ठा जडली । दीक्षितें[2] नरक्यांही[3] संथा दिधली ॥
अक्षर ओळख करून घेतली । पोथी चढली जिव्हेवर ॥ १२९ ॥

असो हा माधवरावांचा वाद[4] । साई शुद्धबोधानुवाद ॥
परमानंद पूर्ण हा विनोद । निर्विवाद सुखदायी ॥ १३० ॥

एकदां काकासाहेब दीक्षित । नियमानुसार प्रातःस्नात ॥
असतां आसनस्थित ध्यानस्थ । दर्शन पावत विठ्ठलाचें ॥ १३१ ॥

पुढें जातां बाबांचे दर्शना । नवल बाबा पुसती तयांना ॥
विठ्ठल पाटील आला होता ना । भेट झाली ना तयाची ॥१३२॥

मोठा पळपुट्या तो विठ्ठल । मेख मारूनि करी अढळ ॥
दृष्टी चुकवूनि काढील पळ । होता पळ एक दुर्लक्ष ॥ १३३ ॥

हा तो प्रातःकाळीं प्रकार । पुढें जेव्हां भरली दुपार ॥
पहा आणीक प्रत्यंतर । विठ्ठल दर्शन सोहळा ॥ १३४ ॥

पंढरपुरच्या विठोबाच्या । छब्या पांचपंचवीस साच्या ॥
घेऊनि कोणी बाहेर गांवींचा । विकावयाच्या इच्छें ये ॥ १३५ ॥

सकाळीं ध्यानीं आली जी मूर्ति । तियेचीच संपूर्ण प्रतिकृती ॥
पाहूनि दीक्षित विस्मत चित्तीं । बोल आठवती बाबांचे ॥ १३६ ॥

दीक्षित तंव अति प्रीती । विकणारासी मोल देती ॥
छबी एक विकत घेती । भावें लाविती पूजेस ॥ १३७ ॥

---

१ कळण्यास अवघड. २ रा. रा. हरी सिताराम दीक्षित बी. ए. एल. एल. बी. ३ प्रोफेसर गणेश गोविंद नरके एम्. ए. ४ साईबाबाबरोबर झालेले संभाषण.

तैसेच ब्रह्मविद्या अभ्यासिती । तयांची बाबांस मोठी प्रीती ॥
प्रसंगोपात्त अभिव्यक्ति । दाविती कैसी अवलोका ॥ १३८ ॥

एकदां जोगांची आली बंगी । शिरडी पोस्टांत टपालमार्गीं ॥
स्वीकारावया तया जागीं । लागवेगीं निघाले ॥ १३९ ॥
पुस्तक पाहती तों तें भाष्य । लोकमान्यांचें गीतारहस्य ॥
बगलेस मारून मशीदीस । दर्शनास पातले ॥ १४० ॥
नमस्कारार्थ खालवितां डोई । बंगीही पडली बाबांचे पायीं ॥
'बापूसाब ही कशाची काई' । बाबा ते ठायीं पूसती ॥ १४१ ॥
बंगी मग समक्ष फोडिली । कसली काय ती वार्ता कळविली ॥
ग्रंथासह बाबांचे हातीं दिधली । अवलोकिली बाबांनीं ॥ १४२ ॥
ग्रंथ काढोनि हातीं घेतला । क्षणार्धांत चाळून पाहिला ॥
खिशांतून एक रुपया काढिला । वरती ठेविला कौतुकें ॥ १४३ ॥
रुपयासह मग तो ग्रंथ । घातला कीं जोगांचे पदरांत ॥
म्हणाले हा वाच साद्यंत । कल्याणप्रद होईल ॥ १४४ ॥
ऐशा बाबांच्या अनुग्रह कथा ॥ वर्णितां येतील असंख्याता ॥
ग्रंथ पावेल अति विस्तृतता । म्हणोन संक्षिप्तता आदरीं ॥ १४५ ॥
एकदां शिरडींत ऐसें झालें । दादासाहेब खापर्डे आले ॥
सहपरिवार तेथें राहिले । प्रेमे रंगले बाबांच्या ॥ १४६ ॥
खापर्डे नव्हेत सामान्य गृहस्थ । अति विद्वान मोठें प्रस्थ ॥
साई सन्निध जोडूनि हस्त । पायीं मस्तक खालवीत ॥ १४७ ॥
आंग्लविद्या पारंगत । धारासभेंत किर्तिमंत ॥
वक्तृत्वें सर्वांस हालवीत । मूग ते गिळत साईपुढें ॥ १४८ ॥
भक्त बाबांचे असंख्यात । परी त्यां पाशीं मूकव्रत ॥
खापर्डे, नुलकर, बुट्टी व्यतिरिक्त । धरितां न भक्त आढळला ॥ १४९ ॥

इतर सर्व बाबांशीं बोलत । कांहीं तोंडासी तोंडही देत ॥
नाहीं भीडभाड मुर्वत । मूकव्रत तें यां तिघां ॥ १५० ॥

बोलण्याचीच काय कथा । बाबा सन्मुख न तुकविती माथा ॥
अवर्णनीय तयांची लीनता । श्रवण शालीनताही तैसी ॥ १५१ ॥

विद्यारण्यांची पंचदशी । समजून घ्यावी जयांपाशीं ॥
ते दादासाहेब मूकवृत्तीशीं । धरीत मशीदीशी येतांच ॥ १५२ ॥

शब्दब्रह्माचें कितीही तेज । शुद्धब्रह्मापुढें निस्तेज ॥
साई परब्रह्ममूर्ति सतेज । विद्वत्ते लाज लावी ती ॥ १५३ ॥

चार महिने तयांचा वास । कुटुंब राहिलें सात मास ॥
दिवसेंदिवस उभयतांस । अति उल्हास वाटला ॥ १५४ ॥

कुटुंब मोठें निष्ठावंत । साईपदीं प्रेम अत्यंत ॥
साईस नित्य नैवेद्य आणीत । मशीदींत स्वहस्तें ॥ १५५ ॥

होई जों न नैवेद्य ग्रहण । बाईस तोंवर उपोषण ॥
महाराजांनीं केलिया सेवन । मागून जेवण बाईचें ॥ १५६ ॥

असो एकदां आली वेळ । बाबा परम भक्तवत्सल ॥
बाईची श्रद्धा पाहून अचल । मार्ग सोज्वळ दावीत ॥ १५७ ॥

अनेकांच्या अनेक परी । बाबांची तों अगदींच न्यारी[१] ॥
हासतां खेळतां अनुग्रह वितरी[२] । जो दृढ अंतरीं ठसावे ॥ १५८ ॥

एकदां सांज शिरापुरी । भात वरान्न[३] आणि खिरी ॥
सांडगे पापड कोशिंबिरी । बाईनें ताटभरी आणिले ॥ १५९ ॥

ऐसें तें ताट येतांक्षणीं । बाबा अति उत्कंठित मनीं ॥
कफनीच्या अस्तन्या वरी सारुनी । आसनावरूनी ऊठले ॥ १६० ॥

---

१ निराळी. २ देत. ३ वरण.

जाऊनि बैसले भोजनस्थानीं । घेतलें ताट सन्मुख ओढुनी ॥
वरील आच्छादन बाजूस सारुनी । अन्न सेवनीं उद्युक्त ॥ १६१ ॥
नैवेद्य येती इतरही बहुत । राहून सरस अपरिपीन ॥
कित्येक वेळ ते पडून राहत । यावरीच हेत कां इतुका ॥ १६२ ॥
हीतो प्रपंचाची वार्ता । निवारी कां संताचे चित्ता ॥
माधवरावजी साईसमर्था । म्हणती ही विषमता कां बरें ॥ १६३ ॥
अवघ्यांचीं ताटें ठेवूनि देतां । कोणाचीं चांदीचींही दूर भिरकावितां ॥
मात्र या बाईचें येतांच उठतां । खाऊं लागतां नवल हें ॥ १६४ ॥
हिचेंच अन्न कां इतुकें गोड । देवा हें आम्हांस मोठें गूढ ॥
काय तरी हें तुझें गारुड । आवडनिवड तुम्हां कां ॥ १६५ ॥
बाबा म्हणती सांगू काई । काय या अन्नाची अपूर्वाई ॥
पूर्वीं[1] ही एका वाण्याची गाई । दुधाळ लई लठ्ठ असे ॥ १६६॥
मग ती कुठें नाहींसी झाली । माळियाकडे जन्मास आली ॥
तीच पुढें क्षत्रियाकडे गेली । पत्नी झाली वाणियाची ॥ १६७
पुढें ही उपजली ब्राह्मणापोटीं । बहुता काळानें पडली दृष्टी ॥
प्रेमाचे दोन घांस पोटीं । सुखसंतुष्टी जाऊंदे ॥ १६८ ॥
ऐसें म्हणूनि यथेष्ट जेवले । मुख आणि हात धुतले ॥
सहज तृप्तीचे ढेकर दिधले । येऊन बैसले गादीवर ॥ १६९ ॥
बाईनें मग करूनि नमन । आरंभिलें साईचरण संवाहन ॥
बाबांनीं ती संधी साधून । हितगुज सांगून राहिले ॥ १७० ॥
बाई जयांनीं जरण चूरी । दाबीत ते कर बाबा स्वकरीं ॥
पाहूनि देवा भक्तांची चाकरी । करी मस्करी तंव शामा ॥ १७१ ॥
ठीक चाललें आहे कीं देवा । काय मौजेचा हा देखावा ॥
पाहूनि या परस्परांच्या भावा । वाटे नवलावा अत्यंत ॥ १७२ ॥

१ पूर्वील एका जन्मीं.

पाहोनि तीचा सेवा काम। प्रसन्न बाबांचे अंतर्याम ॥
हळूच म्हणती 'राजाराम। राजाराम' वद वाचे ॥ १७३ ॥
ऐसें म्हणत राही नित। सफल होईल आई जीवित ॥
शांत होईल तुझे चित्त। हित अपरिमित पावसील ॥ १७४ ॥
काय त्या वचनाची मात। हृदयांतरीं जाऊन खोंचत ॥
वचन योगेच शक्तिपात। क्षणार्धांत करीत ॥ १७५ ॥
ऐसा कृपाळू श्रीसमर्थ। प्रणतपाळ साईनाथ ॥
पुरवी नित्य भक्तमनोरथ। साधी निजहित तयांचें ॥ १७६ ॥
अत्यंत हित अति प्रीती। अत्यंत लीन श्रोतयांप्रती ॥
कथितों मी तें धरा चित्तीं। करितों विनंती सलगीची ॥ १७७ ॥
लंपट गुळाचिये गोडी। सांडी न मुंगी तुटतां मुंडी ॥
तैसी द्या साईचरणीं दडी। कृपा परवडी रक्षील तो ॥ १७८ ॥
गुरू भक्त हे नाहीं वेगळे। दोघेही एकांग आगळे ॥
प्रयत्ने वेगळे करितां वळे। अभिमान गळे कर्त्याचा ॥ १७९ ॥
एकावाचून एक ठेला। कच्चा गुरू तो कच्चाही चेला ॥
परी जो पक्या[१] गुरूचा केला। द्वैतीं अबोला तयासीं ॥ १८० ॥
गुरू राही एक्या गांवीं। शिष्य तयाचा इतर गांवीं ॥
ऐसें जयाचें मन भावी। ते मानेंभावी[२] उभयही ॥ १८१ ॥
मुळींच जरी नाहींत दोन। वेगळीक मग ती कुठून ॥
एक न राहे एकावीण। इतके अनन्य ते दोघे ॥ १८२ ॥
गुरुभक्तांत नाहीं अंतर। ऐसें वास्तव्य निरंतर ॥
गुरुपदावरि भक्त शिर। हाही उपचार स्थूलाचा ॥ १८३ ॥
भक्त अद्वैत भजनपर। गुरूही अद्वैत भक्तपर ॥
ऐसे न मीनतां[३] परस्पर। केवळ तो व्यवहार नांवाचा ॥ १८४ ॥

१ पदरीं तयार बनलेला. २ दिखाऊ. ३ समरसतां.

कैसे लाधेल अन्नाच्छादन । क्षणमात्रही न करा चिंतन ।
हेतो सर्व प्रारब्धाधीन । प्रयत्नावीण आपाद्य ॥ १८५ ॥
करूं आल प्रयत्ने संपादन । तरी तो होईल व्यर्थ शीण ॥
प्रयत्ने व्हा परमार्थसंपन्न । चिंतन रात्रंदिन हे करा ॥ १८६ ॥
'उत्तिष्ठत' आणि 'जाग्रत' । गाढ निद्रेंत पडलां कां घोरत ॥
श्रुतिमाय[2] तारस्वरें गर्जत । प्रेमें जागवीत भक्तांस ॥ १८७ ॥
सर्वानर्थ बीजभूत । अविद्यानिद्रेत जे जे लोळत ॥
तयांनीं वेळीं होऊनि जागृत । गुरुज्ञानामृत सेवावें ॥ १८८ ॥
तदर्थ होऊनि अति विनीत । व्हा गुरुचरणीं शरणांगत ॥
तो एक जाणे विहिताविहित[3] । आम्हीं तों नेणत लेंकुरें ॥ १८९
साहंकार किंचिज्ञ जीव । निरहंकार सर्वज्ञ शिव ॥
दोघांठायीं अभेदभाव । व्हावया उपाव गुरु एक ॥ १९० ॥
अविद्योपाधि आत्मा जीव । मायोपाधि आत्मा शिव ॥
जाणें घालवूं हा भेदभाव । समर्थ गुरुराव एकला ॥ १९१ ॥
मन संकल्पविकल्पाधीन । करा साईपायीं समर्पण ॥
मग तेथून पावे जें स्फुरण । त्याचें अहंपण त्याजवळ ॥ १९२ ॥
तैसीच सकल क्रियाशक्ती । तीही समर्पा साईप्रती ॥
मग तो आज्ञापी जैसिया रीती । तैसिये स्थिती वर्तावे ॥ १९३ ॥
जाणा सकल साईची सत्ता । भार घालोनी तया वरता ।
कार्यें करितां निरभिमानता । सिद्धि ये हाता अविकळ ॥ १९४ ॥
परी म्हणाल मीं हें करीन । धराल अत्यल्पही अभिमान ॥
फळ येईल तात्काळ दिसोन । विलंब क्षणही न लागेल ॥ १९५ ॥

---

१ मिळणारें. २ काठकोपनिषद्. ३ योग्य काय अयोग्य काय.

मायामोह निरसीस। या कुशीचे त्या कुशीस।
हेमाड असतां देतां आळस। हरि गुरु कृपेस लाधला॥ १९६॥
तें ही केवळ अदृष्टवशें। विना अभ्यास वा प्रयासें॥
त्यांनींच केवळ निजोद्देशें। गौरविलें ऐसें यातें॥ १९७॥
करावया भक्तोद्धार। करोनि निज चरित्र विस्तार॥
बळेंच त्याचा धरोनि कर। ग्रंथ सविस्तर लिहिविला॥ १९८॥
अखंडानुसंधान सूत्र। अनन्य प्रेमपुष्पीं विचित्र॥
गुंफोनिया हार मनोहर। अर्पू सादर साईस॥ १९९
मिळवूं स्वराज्यसिंहासन। होऊं स्वपदीं विराजमान॥
भोगूं स्वानंद निरभिमान। सुखायमान निजांतरीं॥ २००॥
ऐसें अगाध साई चरित्र। पुढील कथा याहून विचित्र॥
दत्तावधान व्हा क्षणमात्र। श्रवण पवित्र करावया॥ २०१॥
पुढे येईल अध्यायत्रयी। बाबा बैसूनि ठायींचे ठायीं॥
दृष्टांताची अपूर्वाई। पहा नवलायी दावितील॥ २०२॥
त्यांतील आरंभीचा अध्याय। लाला लखमीचंद्राचा विषय॥
प्रेमसूत्रें बांधून पाय। दाविला निजठाय तयास॥ २०३॥
ब्र्हाणपूरस्थ बाई एक। तिचिया खिचडीलागीं कामुक॥
होऊनि केलें दर्शनोत्सुक। दाविलें कौतुक प्रेमाचें॥ २०४॥
पुढें मेघाचिया स्वप्नांत। त्रिशूळ काढाया झाला दृष्टांत॥
तयापाठीं अकस्मात। लिंग हो प्राप्त शंकराचें॥ २०५॥
ऐसऐसिया अनेक कथा। येथून पुढें येतील आतां॥
भक्तिपूर्वक ऐकतां श्रोतां। श्रवण सार्थकता होईल॥ २०६॥

---

१ शरीरास आलेपिळे. २ दैववशात् ३ ज्ञानस्वरूपरूपी स्वराज्य.
४ तीन अध्याय. ५ या नांवाचा श्रीचा निःसीम भक्त होऊन गेला तो.

सैंधव सिंधू निमज्जन । तैसा हेमाड साईंस शरण ॥
सोहंभावाचें अभिन्नपण । त्या अनन्यपणें नमन करी ॥ २०७ ॥

तरी करी प्रेमें विनवण । लागो अहर्निश साईंचे ध्यान ॥
त्यावीण ध्यानीं न रिघो आन । मन सावधान असावें ॥ २०८ ॥

होवो मागील परिहार । पुढील निर्दळून जावा पार ॥
अवशेष जें मध्यंतर । राहो निरंतर गुरु पायीं ॥ २०९ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरिचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । दीक्षानुग्रहदानंनाम
सप्त विंशतितमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

---

१ मिठाचा खडा.

## आग्रहाची विनंति

श्री साईलीलेच्या दुसऱ्या वर्षाचा शेवटचा अंक आज आम्ही वाच-काचे हातीं देत आहोत. ज्या सद्गुरूंच्या प्रेरणेने या मासिकास दोन वर्षा-पूर्वी सुरवात झाली, त्यांच्याच कृपाछत्राखालीं त्याचीं दोन वर्षे पुरीं झालीं. .मवर्षी अधिकमास आल्यामुळे, गेल्या दोन वर्षांत २४ ऱ्या ऐवजीं २ अंक आम्हीं वाचकांना दिले. काहीं अंकातून निरनिराळ्या देखाव्याचीं त्रे दिलीं. पुढील वर्षांत आम्ही आणखी काहीं नवीन उपक्रम करण्याचे जले आहे अपुरे वर्गणीदार, प्रोत्साहनाची वाण आणि श्रीसाईभक्तांचे दासिन्य इतक्या अडचणींतूनही आम्हीं ही सद्गुरूंची सेवा दोन वर्षे पमितपणें केली. आता आमचे जवळील सामुग्री फार तर आणखी वर्षभर पुरेल व नतर आम्हाला आमच्या प्रिय वाचकांची कदाचित् प्रमची रजा घ्यावी लागेल. चालू वर्ष संपत आले, त्याचे बाराही अंक म्ही दिले तरी अद्यापि काहीं ग्राहकाकडून या वर्षाच्या वर्गणीची रक्कम बाकी आहे. काहीं सदय ग्राहकांनीं तर या वर्षाच्या सुरवातीचे दोन क घेऊन आधीं सूचना देऊन तिसरा अंक व्ही पी. नें पाठविला अस-ी याची व्ही. पी बेधडक परत केली व आम्हला व्ही. पी. चा भूर्दंड ण्यास लाविले. आमचे प्रिय ग्राहकहो, असे यापुढे करूं नका वर्गणी ती ती अल्प. फक्त तीन रुपये सहा आणे म्हणजे महिना फक्त साडेचार णे अगदींच कोणी निष्कांचन असेल त्यालाच ही अल्प वर्गणी जड वाटेल. मची सर्व ग्रहकाना नम्र विनंती आहे कीं, कृपा करून तिसऱ्या वर्षाची ेणी रु ३।= चैत्र अखेर आमचेकडे मनीआर्डरने पाठवून द्या. त्यांत पले -।- वाचतील. ज्यांचे कडून याप्रमाणे वर्गणी न येईल, त्यांना ल अंक आगाऊ सूचना देऊन आम्हीं रु. ३॥= व्ही. पी. पाठवूं मात्र

**ाकरून व्ही. पी. परत करून आम्हांला नुकसानींत घालूं नका. पढच्या वर्षाकरितां अंक चालू ठेवण्याची आपली इच्छा नसेल, तसें आम्हांला आगाऊ कळवा, पण व्यर्थ आमचे चार आणे ांत वांया दवडूं नका.**

संपादक